बाविलं ८६६५

साने गुरुजींच्या गोड गोष्टी : १०

चित्रा नि चारू

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई.

करी मनोरंजन जो मुलांचे । जडेल नाते प्रभुशी तयाचे ॥

सानेगुरुजींच्या गोड गोष्टी सानेगुरुजींच्या गोड गोष्टी सानेगुरुजींच्या गोड गोष्टी

"करी मनोरंजन जो मुलांचे।
जडेल नाते प्रभुशी तयाचे।।"

गोड गोष्टी : भाग दहावा

चित्रा नि चारू

: लेखक :

सानेगुरुजी, एम्. ए.

सानेगुरुजींच्या गोड गोष्टी सानेगुरुजींच्या गोड गोष्टी सानेगुरुजींच्या गोड गोष्टी

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ(THORALE)
NAGAR WACHNALAYA SATARA
111819

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई.

किंमत आठ रुपये

© केशव भिकाजी ढवळे

नवीन पुनर्मुद्रण मार्च १९९३

टाइपसेटिंग :
अक्षय फोटोटाइपसेटर्स, 'कुलदीपक', सुभाष पथ,
महानगरपालिकेशेजारी, ठाणे - ४०० ६०१.

प्रकाशक :
धनंजय बाळकृष्ण ढवळे, केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ सदन, पहिली भटवाडी, गिरगाव, मुंबई - ४.

मुद्रक :
पांडुरंग बाळाजी बागवे
सुदर्शन आर्ट प्रिंटिंग प्रेस, प्रा. लि.
वडाळा उद्योग भवन, वडाळा, मुंबई ३१.

तामिळी प्रेमकथा

गोड गोष्टींतील हा दहावा भाग. ही दहा भागांची माला आता पुरे. हे दहाही भाग श्री. केशवराव ढवळे यांनी सुंदर रीतीने छापून मराठी वाचकांस दिले. श्री. ढवळे यांस धन्यवाद.

दहाव्या भागातील ही गोष्ट तामीळ भाषेतील आहे. धुळे जेलमध्ये भेटलेल्या एका तामिळी मित्राने तामीळ वाङ्मयातील नवलकथांमधील गोष्टी मला सांगितल्या होत्या. त्या गोष्टींपैकीच ही एक. मूळच्या कादंबरीचे नाव मला माहीत नाही; परंतु त्या मित्राने ही गोष्ट जेव्हा सांगितली तेव्हा ती मला आवडली होती. त्याने सांगितलेली गोष्ट मनात ठेवून ही गोष्ट मी लिहून काढली आहे. वाचक गोड करून घेवोत.

गोड गोष्टींची ही माला पूर्ण झाली.

आता पुढे काय? देवाला माहीत.

साने गुरुजी

भाग दहावा : चित्रा नि चारू

अनुक्रमणिका

चित्रा	५
महंमदसाहेबांची बदली	१०
चित्रेचे लग्न	१४
सासूने चालवलेला छळ	३०
चित्रावर संकट	३८
चित्राचा शोध	४७
चित्रेच्या वडिलांना वेड लागते	५२
चित्राची कहाणी	५९
आमदार हसन	६७
आनंदी आनंद	७३

चित्रा नि चारू : प्रकरण पहिले

चित्रा

बळवंतराव मामलेदार फार लोकप्रिय होते. मामलेदार म्हणजे तालुक्याचा राजा. हिंदुस्थानातील इंग्रजांचा कारभार तेच चालवीत होते असे म्हणा ना. मामलेदारावर तालुक्यातील सुखदुःख अवलंबून असते. मामलेदार सव्यसाची असतो. त्याला मुलकी सत्ता व फौजदारी सत्ता असते. आरोप करणारा तोच, शिक्षा देणारा तोच. तालुक्यातील पीकपाणी कसे आहे याचा अहवाल तोच देणार. सारासूट द्यायला हवी की नको याची शिफारस तोच करणार. गोरगरिबांवर अन्याय होत नाहीत ना, हे तोच पाहाणार. मामलेदार मनात आणील तर तालुका सुखी करू शकेल. निदान त्याच्या हातात असते तितके जरी तो प्रामाणिकपणे करील तरी लोकांना पुष्कळसे हायसे वाटेल.

बळवंतराव हे अपवादात्मक मामलेदार होते. लाचलुचपत त्यांना माहीत नव्हती. ते पापभीरू व देवभीरू होते. इकडे देवदेवतार्चन भरपूर करावयाचे व तिकडे पैसे खावयाचे असा त्यांचा धर्म नव्हता. ते फिरतीवर गेले म्हणजे शेतकरी त्यांना भेटी देत. कोणी तूप देई, कोणी काही देई, परंतु बळवंतराव घेत नसत.

'मला धुतल्या तांदळासारखा राहू दे. तुम्ही कदाचित प्रेमानेही देत असाल, परंतु लोक निराळा अर्थ करतील. म्हणतील की, हा मामलेदार लाच घेतो. नकोच हे घेणे.' असे ते म्हणावयाचे.

त्यांची नुकतीच निर्मळपूरला बदली झाली होती. सामानसुमान सारे आले. ते आधी एकटेच पुढे आले होते. मंडळी मागून आली. त्यांच्या पत्नीचे नाव सीता. सीताबाईंना एक मुलगी व तीन मुलगे होते. मुलगी सर्वांत मोठी, तिचे नाव चित्रा. चित्रा आता जवळजवळ १५ - १६ वर्षांची होती. भावांची नावे

श्यामू, रामू व दामू अशी होती. श्यामू बारा वर्षांचा होता. रामू दहा वर्षांचा. दामू सात वर्षांचा होता. दामूच्या पाठीवर मात्र सीताबाईंस मूल झाले नव्हते. सर्वांत लहान तो सर्वांचा लाडका होता; परंतु बळवंतरावांचे चित्रावर फार प्रेम होते. चित्रा जन्माला आली व ते मामलेदार झाले होते. इतक्या लवकर आपणास मामलेदारीचा योग आला याचे कारण चित्रा, असे ते म्हणत. चित्रा म्हणजे आपल्या कुटुंबाचे भाग्य आहे, सुदैव आहे, असे ते म्हणायचे. चित्राच्या आधी झालेली मुले मरण पावली होती; परंतु चित्रा जगली, मोठी झाली, तीच वाचली एवढेच नव्हे, तर आपल्या पाठच्या भावंडांनाही तिने आयुष्य दिले, यामुळे बळवंतराव चित्राला जीव की प्राण करीत. तिचे मन ते कधी दुखवीत नसत. तिची इच्छा नेहमी पूर्ण करीत.

चित्रा आता इंग्रजी शाळेत होती. पाचवी-सहावीत होती. निर्मळपूरच्या फौजदारांची नात फातमा तिची मैत्रीण होती. फातमा तिच्याच वर्गात होती. मुसलमान मुली इंग्रजी शाळेत क्वचितच असतात, परंतु फातमाचे आजोबा सुधारक होते. ज्ञान ही पवित्र वस्तू आहे असे ते म्हणत. बुरख्याचे थोतांड त्यांस पसंत नसे.

फातमाची आई लहानपणीच वारली होती. तिच्या बापाने पुढे दुसरे लग्न केले. फातमा आजोळीच असे. आजोबा महंमदसाहेब फातमावर जीव की प्राण प्रेम करीत. फातमाचा बाप हसन तिला भेटायला मधूनमधून येत असे.

एकदा एके रविवारी बळवंतराव एका खेड्यावर वनभोजनासाठी गेले होते. एका मळ्यात उतरले होते. फौजदार महंमदसाहेब व फातमा हीही आली होती. चित्रा, श्यामू व रामू हीही आली होती. सुंदर अशी बैठक आमराईत घातलेली होती. तिकडे मोट धो धो चालू होती. भाजीपाल्याच्या आसपास फुलझाडेही होती. श्यामू व रामू तिकडे रंगले. रताळी उपटून ते खात होते. टमाटो मटकावीत होते.

बळवंतराव व चित्रा, महंमदसाहेब व फातमा ही बोलत बसली होती. गावचे काही प्रतिष्ठित लोक तेथे बसलेले होते. बोलता बोलता धर्माच्या गोष्टी निघाल्या.

'महंमदसाहेब, तुमचे बाकी धाडस आहे. फातमाला तुम्ही मोकळेपणे मुलांच्या शाळेत शिकवता, याचे कौतुक वाटते.' बळवंतराव म्हणाले.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

'रावसाहेब, तुम्ही तुर्कस्तानात जाल तर चकित व्हाल. जगात कोठेही नाही इतके स्त्रीस्वातंत्र्य तेथे आहे. तुर्की असेंब्लीत जितक्या स्त्रिया आहेत, तितक्या स्वातंत्र्याचे माहेरघर समजले जाणाऱ्या अमेरिकेच्या सेनेटमध्येही नाहीत. केमाल पाशाने ही क्रांती केली.'

'परंतु तुम्हा मुसलमानांस हे आवडते का ? हिंदी मुसलमान केमालचे कौतुक करतील, परंतु आपल्या स्त्रियांना जनानखान्यात, पडद्यात ठेवतील.' बळवंतराव म्हणाले.

'मला माझ्या धर्मबंधूंची कीव येते. पैगंबरांचा थोर संदेश अद्याप आम्हाला समजला नाही. ज्ञानाला पैगंबर फार मान देत. पैगंबरांची मुलगी फातमा कुराणावर प्रवचन करी. हुतात्म्यांच्या रक्तापेक्षाही नवीन ज्ञान देणारी शाईची एक ओळ अधिक महत्त्वाची आहे असे पैगंबर म्हणत. रात्रंदिवस नमाज पढणाऱ्यांपेक्षा सृष्टीचे गूढ उकलणारा, सृष्टीचे नीट परीक्षण करणारा, निसर्गाचा अभ्यास करणारा अधिक धार्मिक होय असे पैगंबर म्हणत. पैगंबरांचा संदेश पहिली तीनचारशे वर्षे आम्ही ऐकला व इ. सनाच्या ७ व्या ते १० व्या शतकापर्यंत ज्ञानात आम्ही अग्रेसर होतो. प्रचंड विद्यापीठे आम्ही स्थापिली, सर्व शास्त्रांत शोध लावले. रावसाहेब, इस्लामी धर्मातील ती तेजस्वी ज्ञानोपासना आमच्यात केव्हा सुरू होईल ते खुदा जाणे.'

'स्त्रियांच्या बाबतीत पैगंबरांची दृष्टी कशी होती ?'

'अत्यंत उदार होती. स्वर्ग जर कोठे असेल तर तो मातेच्या चरणी आहे असे ते म्हणत. स्त्रियांना त्यांनी वारसा हक्क दिला. त्यांना काडीमोडीची परवानगी दिली. पैगंबरांनी त्यांच्या काळात अरबस्तानातील परिस्थिती लक्षात घेऊन खरोखरच किती तरी केले.'

'परंतु त्यांनी बहुपत्नीकत्वाची चाल ठेवली.'

'त्याचे कारण आहे. अरबस्तानात स्त्रियांची संख्या जास्त होती. शिवाय युद्धकैद्यांच्या स्त्रियांचे काय करायचे हाही प्रश्न असे. त्यांना गुलाम करण्यापेक्षा पत्नी म्हणून करून घेणे अधिक भूतदयेचे असे. असे अनेक प्रश्न त्या काळातील अरबस्तानात होते; परंतु तुम्ही लक्षात ठेवले पाहिजे की, पैगंबरांनी कुराणात स्वच्छ सांगितले आहे की, 'चार बायकांची मर्यादा ठेवा.' एवढेच नव्हे, तर ते पुढे म्हणतात, 'एकच करणे अधिक श्रेयस्कर .'

'परंतु काय हो महंमदसाहेब, पैगंबरांनी तर खूप लग्ने केली.'

'त्या लग्नांकडे निराळ्या दृष्टीने आपण पाहिले पाहिजे. लक्षात ठेवा की, पैगंबरांची पहिली पत्नी खदिजा जोपर्यंत जिवंत होती तोपर्यंत त्यांनी दुसरी बायको केली नाही. ते जर केवळ भोगासक्त असते तर ते इतकी वर्षे असे एकपत्नी राहाते ना. खदिजेच्या मरणानंतरची पैगंबरांची लग्ने ही अरबी भांडणे बंद करण्यासाठी होती. निरनिराळ्या जाती, वंश, कुळे यांत भांडणे असत; परंतु पैगंबरांनी त्या त्या कुळांतील एखाद्या स्त्रीशी लग्न केले, म्हणजे आपोआप भांडणे थांबत. कधी धर्माच्या कामी मरण पावलेल्यांच्या पत्नीचा तिच्याशी लग्न करूनच ते अधिक सांभाळ करू शकत. रावसाहेब, महापुरुषांची लग्ने कधीकधी त्या स्त्रीच्या रक्षणार्थ केवळ असतात. त्यात कामुकता नसते. पैगंबर जर असे विषयासक्त असते तर त्यांचा प्रभाव पडता का? आज तेराशे वर्षे पैगंबर कोट्यवधी लोकांच्या हृदयाचे सम्राट आहेत, ते तसे राहाते का? कोणा भोगी किड्याने कोट्यवधी जनतेला शेकडो वर्षे मार्गदर्शन केल्याचे आहे का उदाहरण?'

'महंमदसाहेब, तुमचे म्हणणे खरे आहे. पैगंबर एक अवतारी विभूती होऊन गेले. मराठीत त्यांचे सुंदर चरित्र अद्याप नाही. हिंदुस्थानात आपण हिंदू- मुसलमान एकत्र राहातो, परंतु सहानुभूतीने एकमेकांच्या संस्कृतीचा कधी अभ्यास केला नाही. आपण दूर दूर राहिलो.' बळवंतराव म्हणाले.

'एके काळी तसा प्रयत्न झाला...' महंमदसाहेब म्हणाले.

'परंतु इंग्रजांनी येऊन अडथळा केला. होय ना आजोबा?' फातमा मध्येच म्हणाली.

'होय.' बळवंतराव म्हणाले.

'मी पैगंबरांचे मराठीत सुंदर चरित्र लिहीन. मी मराठीच मातृभाषा मानते. महाराष्ट्रात राहून मराठी लिहिता वाचता न येणे म्हणजे लाजिरवाणे आहे. नाही का ग चित्रा?' फातमा चित्राचा हात हातात घेऊन म्हणाली.

'फातमा, तू मला मराठीतून पत्र लिहीत जा. मला विसरू नकोस.' चित्रा म्हणाली.

'फातमा आता लौकरच जाईल. तिचे आता लग्न होणार आहे. तिच्या बापाने ठरवले आहे. तो माझे ऐकत नाही.' महंमदसाहेब म्हणाले.

'मग फातमाचे शिक्षण? महंमदसाहेब, मी खूप शिकणार आहे. होय ना बाबा? माझे नाही ना लवकर लग्न करणार?' चित्राने लडिवाळपणाने बापास विचारले.

'तुझ्या आईचाही आग्रह चालला आहे. मिळाले चांगले स्थळ तर देऊ अडकवून!' बळवंतराव म्हणाले.

'फातमा, आपण कोठेही गेलो तरी एकमेकींस पत्रे पाठवू हां.' चित्रा म्हणाली.

'पाठवू, खरेच पाठवू.' फातमा म्हणाली..

इतक्यात तिकडे श्यामू व रामूचे भांडण जुंपले. दोघे एकमेकांना ओढीत होते. श्यामू म्हणे मी मोट हाकून बघतो. रामू म्हणे मी. बळवंतरावांनी दोघांना हाका मारल्या आणि फातमा व चित्रा खाण्याची तयारी करू लागल्या. आनंदाने जेवणे झाली. गाड्या जोडून पुन्हा सारी निर्मळपूरला आली.

❋ ❋ ❋

चित्रा नि चारू : प्रकरण दुसरे

महंमदसाहेबांची बदली

बळवंतराव निर्मळपूरला आले, परंतु त्यांचे मित्र बनलेले महंमदसाहेब फौजदार यांचीच आता बदली झाली. बळवंतराव व महंमदसाहेब यांचा थोड्या दिवसांत खूप परिचय झाला होता. विशेषतः फातमा व चित्रा यांची मैत्री फारच जडली होती. फातमा चित्राकडे नेहमी यावयाची. दोघींच्या गप्पागोष्टी चालायच्या. दोघी झोपाळ्यावर बसत. झोके घेत. चित्रा पेटी वाजवी, फातमा गाणी म्हणे. चित्रा आईजवळून खायला आणी व दोघी मैत्रिणी खोलीत बसून खात.

'चित्रा, आजोबांची येथून बदली होणार. मी येथून जाणार. आपण एकमेकींपासून दूर जाणार. पुन्हा कधी, कोठे भेटू, काय सांगावे?'

'फातमा, तुझे लग्नही होईल. पुढे काय काय होईल कोणी सांगावे? तू तुझ्या सासरी गेलीस म्हणजे कदाचित पडद्यात अडकशील. हे आजोळचे प्रेमळ मोकळे स्वातंत्र्य तुला पुन्हा मिळेल की नाही? तू मला कशी पत्रे पाठवणार? सारे मनोरथ मनातच राहातील. आपली कदाचित पुन्हा भेटही होणार नाही. मला वाईट वाटते. खरेच वाईट वाटते. फातमा, तू इतकी कशी ग चांगली? मी तुझी मैत्री जोडली, म्हणून इतर मुली माझ्याकडे येत नाहीत. न येऊ देत. तू मला एकटी पुरेशी आहेस.'

'चित्रा, तुझी आई फार मायाळू आहे. ती मला तुझ्याकडे येऊ देते म्हणून. ती न येऊ देती तर?'

'माझी आई माझ्यावर जीव की प्राण करते.'

'मला आईच नाही.'

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

'परंतु तुझे आजोबा आईची आठवण नाही ना येऊ देत?'

'होय चित्रा, पैगंबरांचे आईबापही लहानपणीच वारले. ते पोरके होते. पोरक्या मुलांविषयी पैगंबरांना फार प्रेम वाटे. कुराणात पुन्हा पुन्हा सांगितले आहे की, 'पोरक्या मुलांना फसवू नका. त्यांची इस्टेट लुबाडू नका. त्यांना प्रेम द्या.' आजोबा मला प्रेम देत आहेत.'

'तुझ्या वडिलांचे तुझ्यावर प्रेम नाही का?'

'आहे, परंतु ते दूर असतात. मला कपडे पाठवतात. खाऊ, पुस्तके पाठवतात. आता मी त्यांच्याकडेच जाणार आहे. सावत्र आईजवळ. चित्रा, लवकरच माझे लग्न होईल. बाबा लग्न करणारच माझे यंदा.'

'तुझे वडील खरेच का निवडणुकीस उभे राहाणार आहेत?'

'हो. त्यांना फार नाद. हजारो रुपये खर्च करतात निवडणुकीसाठी.'

'ते कोणत्या पक्षाचे आहेत?'

'ते स्वतंत्र पक्षाचे.'

'परंतु कोणत्या तरी पक्षाचे असल्याशिवाय लोक मते देत नाहीत.'

'बाबा नेहमी निवडून येतात. ते उदार आहेत. सर्वांना मदत करतात. ते पक्षातीत आहेत. ते सर्वांचे मित्र आहेत. त्यांना शत्रू नाही. ते म्हणतात, मी निवडणुकीत कधी पडणार नाही. एकदा पडलो तर पुन्हा उभा राहाणार नाही.'

'फातमा, तुला मी काय देऊ? कोणती भेट देऊ?'

'तुझे ते मराठी संक्षिप्त रामायण मला भेट दे. मला फार आवडते राम- सीतेची गोष्ट.'

'दुसरे काही माग.'

'काय मागू? असेच प्रेम ठेव. मुसलमान म्हणजे वाईट असे नको समजू. जे असे म्हणतील त्यांना सांग की, माझी एक मुसलमान मैत्रीण आहे. तिचे नाव 'फातमा'. ती माझ्यावर प्रेम करी. चित्रा, हिंदुमुसलमानांची भांडणे ऐकून तुला वाईट नाही वाटत?'

'फातमा, आपण लहान मुली काय करणार?'

'जेवढे होईल तेवढे करू. चित्रा, तुला मी 'इस्लामी संत' हे पुस्तक भेट म्हणून देईन. ती माझी तुला आठवण.'

'फातमा, थांब, शेवटचा फराळ करून जा. मी घेऊन येते हं. येथे बैस.'

चित्रा खाली गेली. आईजवळून तिने चकल्या, लाडू वगैरे फराळाचे सामान आणले. लिंबाचे सरबत तिने केले होते. दोघी मैत्रिणींनी फराळ केला. दोघी सरबत प्यायल्या.

'जाते आता चित्रा.'

'हे घे रामायण.'

'तुला मी विसरणार नाही.'

फातमा गेली. चित्रा एकटीच आता खोलीत बसली होती. 'खरेच का आपलेही लग्न बाबा लवकर करणार?' ती विचार करीत होती, परंतु तिला तो विचार आवडला नाही.

'चित्रा, स्टेशनवर येतेस का?' बळवंतरावांनी विचारले.

'कशाला?'

'अग, ते महंमदसाहेब आज जाणार आहेत.'

'उद्या ना जाणार होते?'

'नाही, आजच जाणार आहेत. तुझी फातमा आली होती ना? तिने नाही का सांगितले?'

'तिला नक्की दिवस माहीत नव्हता.'

'चल. तुझ्या मैत्रिणीला निरोप दे.'

'बाबा, फातमास मी काय देऊ?'

'काय देतेस?'

'तिला एखादी सुंदर ओढणी घेऊन दिली असती.'

'खरंच. छान होईल. मी मागवतो हो.'

आणि बळवंतरावांनी एका दुकानातून सुंदर रेशमी ओढणी ताबडतोब मागवून घेतली. चित्राला ती आवडली. पित्याबरोबर ती स्टेशनवर गेली.

'रावसाहेब, आपण कशाला आलेत मुद्दाम?' फौजदारसाहेब म्हणाले.

'मित्र म्हणून आलो. रावसाहेब म्हणून नव्हे आणि चित्रालाही यायचे होते.'

चित्राने फातमाला ती ओढणी दिली. फातमाने खांद्यावरून व डोक्यावरून ती घेतली. छान दिसत होती.

'फातमा, किती तू छान दिसतेस?'

'चित्रा, तूही मला सुरेख दिसतेस.'

'ज्याच्यावर आपण प्रेम करतो ते नेहमी चांगलेच दिसते.' बळवंतराव म्हणाले.

❋ ❋ ❋

शेतकरी, विणकरी, रंगारी, पिंजारी, सोनार, सुतार, लोहार, कुंभार– सर्व

चित्रा नि चारू : प्रकरण तिसरे

चित्रेचे लग्न

निर्मळपूर तालुक्यात गोडगाव म्हणून एक खेडे होते. गोडगावला एक मोठे जहागीरदार होते. त्यांच्या मुलाचे नाव चारू. एकुलता एक मुलगा. फारच देखणा होता तो मुलगा. चारू जसा दिसायला सुरेख होता, तसाच स्वभावानेही चांगला होता. सारा गाव त्याच्यावर प्रेम करी.

चारूचे मराठी शिक्षण संपले. त्याने इंग्रजी शिक्षणही घेतले. थोडे दिवस कॉलेजमध्येही तो होता; परंतु १९३० सालच्या चळवळीत त्याने कॉलेज सोडले. तो चळवळीत भाग घेणार होता, परंतु आईबापांच्या सांगण्यामुळे तो तुरुंगात गेला नाही.

तो तेव्हापासून घरीच असे. घरीच वाची. घरचा एक मळा होता. त्या मळ्यात काम करी. शेतकऱ्यांवर तो फार लोभ करी. शेतकऱ्यांची बाजू घेऊन भांडे.

बळवंतरावांच्या कानांवर चारूची गोष्ट आल्याशिवाय राहिली नाही. ते एकदा गोडगावला मुद्दाम गेले होते. जहागीरदारांकडे उतरले होते. मेजवानी झाली. चारूला पाहून त्यांना आनंद झाला.

'तुम्ही सत्याग्रह संपल्यावर पुन्हा का नाही गेलात कॉलेजात? शिक्षण पुरे झाले असते.' बळवंतरावांनी विचारले.

'शिक्षण म्हणजे ज्ञानच ना? ते घरी बसूनही मला मिळवता येईल. मला नोकरीचाकरी करायची नाही. घरीच बरे. मळ्यात खपावे. शेतकऱ्यांत असावे. त्यांची बाजू घ्यावी. हाच माझा आनंद.' चारू म्हणाला.

'आणि लग्न नाही का करायचे ?'

'आई व बाबा आहेत. त्यांना ती काळजी.'

अशी बोलणी चालली आहेत, तो जहागीरदार आले.

'काय हो, यांचे लग्न नाही का करणार ?'

'हो, आता करायला हवेच. चारूच 'इतक्यात नको' असे म्हणतो. त्याच्या आईने पाहिली आहे एक मुलगी. तिच्या एका मैत्रिणीची मुलगी आहे चारूने त्या मुलीजवळच लग्न लावावे असे तिला वाटते. होय ना रे चारू ?'

'परंतु मला नको ती मुलगी. मी आजोळी गेलो होतो, तेव्हा पाहिली होती. आईचा उगीच हट्ट. त्या मुलीजवळ लग्न लावण्याऐवजी मी असाच राहीन.'

'परंतु, अरे, दुसऱ्या मुली येतील.'

'अहो, चांगल्या मुलाकडे मुलींचे आईबाप खेपा घालतात.'

'खरे आहे.'

अशी बोलणी झाली. मामलेदार गावात हिंडून लोकांच्या तक्रारी वगैरे ऐकून निर्मळपूरला परत गेले. बळवंतरावांना चारू आवडला. हा जावई बरा असे त्यांना वाटले. त्यांनी घरी गोष्ट काढली.

'विचारून पाहू का ? तुला काय वाटते ?' बळवंतरावांनी पत्नीला विचारले.

'परंतु फार शिकलेला नाही ना ?' सीताबाई म्हणाल्या.

'कशाला हवे शिकायला ? नोकरीचाकरी करण्याची जरुरी नाही आणि वाचून ज्ञान मिळविण्याइतका तो शिकला आहे. त्यांच्या घरी सुंदर ग्रंथालय आहे. गावातील लोकांनाही रात्री शिकवतो. मोठा छान मुलगा. गुणी व सुस्वभावीही आणि दिसायला खरोखरच मदनासारखा आहे.'

'परंतु आमची चित्रा त्यांना पसंत पडेल का ?'

'मी एकदा चित्राला घेऊन त्यांच्या मळ्यात जाणार आहे. बघू या कसे जमते ते.'

'बघावी नाडीपरीक्षा.'

आणि तसा एकदा योग आला. जहागीरदारांनीच बोलावले. कारण एकदा बळवंतराव सहज त्यांच्याजवळ म्हणाले होते, 'तुमच्या मळ्यात भरीत-भाकरीचा जमवा बोवा एकदा बेत. मी आमची चित्रा पण घेऊन येईन. खेडेगाव पाहाण्याचा तिला फार नाद.' जहागीरदार ती गोष्ट विसरले नव्हते.

जहागीरदारांकडची गाडी आली. बळवंतराव निघाले. चित्राही निघाली. आज त्यांनी बरोबर दुसरे कोणी घेतले नाही. दामू, रामू, श्यामू सारे पाठीस लागले, परंतु सीताबाईंनी त्यांची समजूत घातली.

'ताईला दाखवायला नेत आहेत वाटते?' श्यामूने हसून विचारले.

'अय्या, होय ग आई?' रामूने टाळी वाजवून म्हटले.

'चहाटळ आहात. चला घरात!' सीताबाई म्हणाल्या.

बळवंतराव व चित्रा गोडगावच्या मळ्यात आली. फारच सुंदर होता मळा. प्रसन्न वाटत होते. मळ्यात एक लहानशी बंगली होती. तिच्या दिवाणखान्यात बैठक होती. बळवंतरावांचे जहागीरदारांनी स्वागत केले.

'बाबा, मी बाहेरच हिंडते. मला नाही असे आत आवडत.' असे म्हणून चित्रा बाहेर गेली.

तिकडे चारू बाहेर होता. फुले तोडून गुच्छ करीत होता. चित्राने चारूकडे पाहिले. त्याने तिच्याकडे पाहिले. कोणी बोलले नाही; परंतु थोड्या वेळाने –

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

'मला छान करता येतो गुच्छ. मी करू का?' चित्राने विचारले.

'परंतु तुम्हाला देण्यासाठी तर मी करीत आहे. पाहुणेमंडळींचे स्वागत करायला हवे. बाबांनी मला सांगितले, गुच्छ कर म्हणून.'

'तुम्ही आम्हाला गुच्छ द्या, आम्ही तुम्हाला देऊ.'

'परंतु आमचीच फुले घेऊन आम्हाला देणार वाटते? तुमच्याकडे बोलवा व द्या मग गुच्छ.'

'आम्ही बोलावले तर तुम्ही याल?'

'परंतु तुमचे वडील मामलेदार. खेड्यातील लोकांना मामलेदार का घरी पाहुणचारास बोलावतील?'

'माझे बाबा तसे नाहीत. ते साधे आहेत. शेतकरी घरी आले, तरी त्यांना बैठकीवर बसवतात. त्यांना पानसुपारी देतात. आम्ही तुम्हाला बोलावू हां; परंतु आधी सांगा, मी करू का गुच्छ? एक तरी करत्येच. तुम्हाला हो द्यायला. तुमच्या वडिलांना द्यायला मला भीती वाटेल, लाज वाटेल.'

'आणि मला द्यायला?'

'आनंद वाटेल. तुम्हाला द्यायला कसली आहे भीती?'

'करा तर मग. मी जातो हे दोन घेऊन.'

'परंतु तुमचे नाव काय?'

'माझे नाव चारू.'

'चारू म्हणजे सुंदर. होय ना?'

'मला संस्कृत फारसे येत नाही.'

'तुम्ही कॉलेजात होतात. मला माहीत आहे.'

'तुम्हाला काय माहीत?'

'एक दिवस बाबा आईला सांगत होते.'

'तुम्ही चोरून ऐकलेत वाटते?'

'कानांवर आले. कान मिटण्याऐवजी ते अधिकच ताणून ऐकू लागल्ये.'

'का बरे?'

'माझ्या लग्नाची कुणकुण घरात चालली आहे हे मला माहीत होते. आपल्या लग्नासंबंधीचे बोलणे कोणाला ऐकावेसे वाटणार नाही?'

'कॉलेजात शिकलेला पाहिजे वाटते तुम्हाला नवरा? तुम्ही मामलेदारांच्या कन्या. तुम्हाला चांगला आय. सी. एस. मिळेल की नवरा.'

'परंतु चारू म्हणजे सुंदर ना?'

'होय.'

'माझे नाव माहीत आहे का तुम्हाला?'

'माझ्या घरी थोडेच कोणी लग्नाचे बोलतो? कसे कळणार तुमचे नाव?'

'तुमची आई तुमच्या लग्नाची खटपट करीत नाही का? मला माहीत आहे.'

'परंतु तुमचे नाव काय?'

'सांगूच?'

'सांगा.'

'हस्त नक्षत्राच्या पुढे कोणते नक्षत्र येते?'

'माझी परीक्षा घेता वाटते?'

'हो.'

'उत्तरा ना?'

'अहो, हस्त नक्षत्राच्या पाठीमागचे नाही! हिन्दुस्थानला पाठीमागे नाही जायचे, पुढे जायचे आहे!'

'उत्तरा, हस्त, चित्रा...'

'हं.'

'तुमचे नाव चित्रा?'

'होय.'

'छान आहे नाव. रवींद्रनाथांच्या एका काव्यमय नाटकाचे नाव चित्रा आहे.'

'तुम्ही आता जा तिकडे. माझा गुच्छ नाही तर तसाच राहील.'

चारू निघून गेला. चित्राने त्याच्याकडे पाहिले. तिने सुंदर गुच्छ तयार केला आणि ती बंगलीत परत आली.

'चित्रा, कोठे होतीस हिंडत?' बळवंतरावांनी विचारले.

'होत्ये फुलांच्या संगतीत.' ती म्हणाली.

'गालांची फुले झाली आहेत. उन्हात इतक्या वेळ का राहायचे?'

'बाबा, लागू दे की एखादे वेळेस थोडे ऊन!'

'तुला भूक लागली आहे का? ही बघ फळे आहेत. आम्ही खाल्ली. तुला ठेवली आहेत.'

'मी का आता एकटीच खाऊ?'

'आमचा चारू पण खाईल. त्यानेच चिरून आणली; परंतु खाल्ली नसतील. चारू, अरे चारू...' जहागीरदारांनी हाक मारली.

'काय बाबा?'

'बस की यांच्याबरोबर. खा फळे. या आताच आल्या. बस.'

'बाबा, मला नकोत.' चारू म्हणाला.

'अरे असा लाजतोस काय? आमचा चारू साऱ्या मुलखाचा लाजरा आहे.'

'परंतु आमची चित्रा साऱ्या मुलखाची धीट. वाटेल त्याच्याजवळ बोलेल. मैत्री करील. ते फौजदार होते ना महंमदसाहेब, त्यांच्याकडेही चित्रा जायची. त्यांची नात फातमा ती हिची मैत्रीण.'

'मुसलमानाशी नको हो मैत्री!' चारू म्हणाला.

'मुसलमान का सारेच वाईट असतात?' चित्राने विचारले.

'इतर देशांतील चांगले असतील. या देशातील तरी वाईट आहेत.' जहागीरदार म्हणाले.

'या देशातील मुसलमान हिंदूतून बाटून झालेले ना? जर ते वाईट असतील तर मुळात हिंदूच वाईट असे नाही का?' चित्राने विचारले.

'वा, चांगलाच वाद करते तुमची चित्रा.' जहागीरदार म्हणाले.

'फार चुरुचुरु बोलते ती. बॅरिस्टर हवा नवरा तिला. इतर नवरे नाही उपयोगी.' बळवंतराव हसून म्हणाले.

'आमचा चारू अगदी मुखस्तंभ!' जहागीरदार जरा ओशाळून म्हणाले.

'अहो, मुखस्तंभ नाहीत काही ते. मघा तिकडे माझ्याजवळ किती तरी वेळ ते बोलत होते. माझे नाव-गाव विचारीत होते. खरे की नाही हो?' चित्राने हसून विचारले.

'परंतु आधी तुम्हीच विचारले.' चारू हसून म्हणाला.

इतक्यात गड्याने येऊन स्वयंपाक तयार आहे असे सांगितले. बोलणे चालले असता फळांचा फन्ना केव्हाच उडवण्यात आला होता.

‘चित्रा, बसायचे का जेवायला? बसूच, लौकर परत जाऊ.’

‘लौकर का बाबा? संध्याकाळ झाली म्हणजे निघू. उन्हातून कशाला?’

‘खरेच, घाई कशाला रावसाहेब?’ जहागीरदार म्हणाले.

‘बरे बघू मग. आता आधी जेवून घेऊ.’ रावसाहेब म्हणाले.

पाटपाणी तयार होते. बळवंतराव, चित्रा, जहागीरदारसाहेब बसले पानांवरून

‘आणि तुमचे चारू नाही का बसत?’ चित्राने विचारले.

‘तो वाढायला थांबेल.’ जहागीरदार म्हणाले.

‘अय्या, बायकांचे काम का ते करणार? मग मीच थांबत्ये. मी वाढत्ये. मला भूकसुद्धा नाही लागली. आत्ता तर फळे खाल्ली. वाढू का मी?’ चित्राने विचारले.

‘चारू, तू सुद्धा बस. रामाच वाढील. सारे चालतेच आपणाला.’ जहागीरदार म्हणाले.

‘रामाच्या ऐवजी रहीम असता तर चालता का हो वाढायला?’ चित्राने विचारले.

‘चित्रा, पुरे आता.’ बळवंतराव म्हणाले.

पाने वाढली गेली. सारी बसली. चित्राचे पान रिकामे होईना.

‘चित्रा, आटप की.’ पित्याने सांगितले.

‘पोट भरलेले आहे.’ ती म्हणाली.

‘जेवल्यावर मळ्यात हिंडा-फिरा. झोके घ्या. सारे पचून जाईल.’ चारू म्हणाला.

‘परंतु बाबा म्हणतात, उन्हात जाऊ नको.’ चित्रा म्हणाली.

‘परंतु झोका झाडाला आहे. तेथे ऊन नाही.’ चारू म्हंणाला.

‘जेवल्याबरोबर का कोणी झोके घेतात?’ ती म्हणाली.

‘जेवल्यानंतर जरा झोपून मग घ्या. येथल्या विहिरीचे पाणी पाचक आहे. काही बाधत नाही. होय ना बाबा?’ तो म्हणाला.

‘होय. फार छान पाणी.’ जहागीरदार म्हणाले.

‘मला हा मळा फार आवडला. येथेच राहावे. मोट आहे, फुले आहेत. झोका आहे, फळे आहेत.’ चित्रा यादी सांगत होती.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

'आणखी काय काय आहे?' पित्याने हसून विचारले.

'काय काय तरी आहे. अजून सारे नीट लक्ष देऊन थोडेच पाहिले आहे! जेवल्यावर पाहीन.' ती म्हणाली.

मजेने हसत खेळत बोलणी चालली, तो पाणी पिताना चित्राला ठसका लागला. अळसूद गेले. ती घाबरली. 'वर बघ, वर बघ. सासू टांगलेली आहे.' बाप हसून म्हणाला.

'सासूच सुनेला टांगीत असेल.' चारू हसून म्हणाला.

'नव्या युगात आता सुनाच सास्वांना टांगतील.' जहागीरदार म्हणाले.

'किती ठसका लागला. फातमाने आठवण काढली असेल. तिचे लग्न लागले असेल.' चित्रा म्हणाली.

जेवणे झाली. बंगलीतील बैठकीवर सारी बसली. तेथे पानसुपारीचे तबक होते. सर्वांनी विडे खाल्ले; परंतु चित्राने पान घेतले नाही.

'तुम्हाला नको का?' चारूने विचारले.

'मला नाही आवडत विडा करायला. चुन्यात बोट घालायचे.' चित्रा म्हणाली.

'परंतु खायला आवडतो ना?' पित्याने विचारले.

'कोणी करून दिला तर मी खाते. फातमाला पान फार आवडे. तिच्या आजोबांच्या तोंडात तर नेहमी पान असायचे. फातमा मला पट्टी करून देत असे. माझे छान रंगे तोंड. फातमाचे नसे रंगत. मग मी काय म्हणायची, बाबा, आहे का माहीत?'

'काय ग म्हणस?'

'फातमा, तुझ्यावर कोणाचे प्रेम नाही. तुझा विडा रंगत नाही. माझ्यावर सर्वांचे प्रेम आहे. माझा विडा रंगतो आणि फातमा म्हणे, तुझेही नाही का माझ्यावर प्रेम? मग मी हसत म्हणे, तुला कळत नाही, काही समजत नाही. फातमा मग मला चिमटा घेई. जणू सारे समजले असे दाखवी.'

इतक्यात चारूने सुरेख विडा तेथे हळूच करून ठेवला. तो उठून गेला. चित्राने तो हळूच उचलून खाल्ला.

'पडा जरा.' जहागीरदार बळवंतरावांस म्हणाले.

'चित्रा, तू पण पड आणि गेलीस झोके घ्यायला, तर फार उंच नको हो झोके घेऊस.' पिता म्हणाला.

बळवंतरावांनी वामकुक्षी केली. चित्राही जरा तेथे लवंडली. जहागीरदारही बाहेर झोपले. चारू मात्र मळ्यात होता.

थोड्या वेळाने चित्रा उठली. ती मळ्यात गेली. झाडाला बांधलेला झोका तिला दिसला. ती तिकडे गेली. झोक्यावर झोके घेऊ लागली; परंतु तिला भीती वाटत होती. इतक्यात चारू तेथे आला. तिचे झोके थांबले. ती खाली उतरली.

'उतरलातशा?' त्याने विचारले.

'तुम्हाला खूप उंच नेता येतो का हो?'

'हो.'

'मला दाखवा बरे.'

चारू झोक्यावर चढला आणि हळुहळू त्याने खूपच उंच झोका नेला. शेवटी तो खाली आला.

'मला नेता येईल का इतका उंच?'

'हो.'

'पडायची नाही ना?'

'पडल्यात तर मी आहे ना?'

'पडल्यावर तुमचा काय उपयोग?'

'लहान लहान मुलेही खूप उंच नेतात.'

चित्रा पुन्हा चढली झोक्यावर, ती झोका खूप उंच नेऊ लागली.

'शाबास, शाबास!' चारू म्हणाला.

तिने आणखी वर नेला; परंतु ती लटपटली, तिला का घेरी आली? तिचा हात सुटला. चित्रा खाली पडली. ती ओरडली. तिकडे गडी-माणसे होती, ती धावत आली. चित्राला बरेच लागले. कपाळाला एक दगड लागला. रक्ताची धार लागली. कोपर बरेच खरचटले. बळवंतराव, ते जहागीरदार, सारे तेथे गजबजून आले. एका गड्याने कसला तरी पाला आणला, भांबुरडीचा पाला. हातावर चोळून तो त्याने चित्राच्या कपाळावर बांधला. रक्त थांबले.

'चित्रा, चालवते का ? ऊठ.' पिता म्हणाला. हळुहळू ती बंगलीत आली. केस तिने एका हाताने साफ केले. कोपर दुखत होते. तिला रडू आले.

'हे काय ! रडतेसशी ? अग उंदीर पळाला ! इतके काही नसेल हो लागले. घरी जायचे का ?' बापाने विचारले.

'आता मी जरा पडत्ये.'

'पड तर मग.'

चित्रा झोपली. थोड्या वेळात खरोखरच तिला झोप लागली. बळवंतराव, जहागीरदार, चारू पत्ते खेळत होते. खेळता खेळता बळवंतराव एकदम मोठ्याने हसले. चित्रा जागी झाली, ती उठली.

'नीज की जरा.' बाप प्रेमाने म्हणाला.

'तुम्ही मात्र खेळणार नि मी निजू वाटते ?'

'तुला लागले ना आहे ?'

'तुम्हीच ना म्हणालेत उंदीर पळाला ? काही नाही लागले, मी येते खेळायला. पाच पानी हुकमाचे खेळू. कोण कोण भिडू ?'

'आम्ही म्हातारे एका बाजूला, तुम्ही दोघे एका बाजूला.'

'चालेल का हो तुम्हाला ?' चित्राने चारूला विचारले.

'मोठ्यांचे ऐकलेच पाहिजे.' तो हसून म्हणाला. खेळ सुरू झाला.

चित्रा व चारू यांच्याकडेच सारखा डाव यावयाचा. चित्राला हसू आवरेना.

'बाबा, तुम्हाला काही कसा येत नाही डाव ?'

'अग, ज्यांचे लग्न व्हायचे असते ना, त्यांच्याकडे डाव येतो.' बळवंतराव म्हणाले.

'यांचे व्हायचे आहे वाटते लग्न ?' तिने हसून विचारले.

'आणि तुमचे जसे व्हायचेच नाही !' चारूही हसून म्हणाला,

'तुमचे दोघांचे लग्न केव्हा तरी होईलच. आज ना उद्या तूही करशील, तूही करशील.' बळवंतराव म्हणाले.

'बाबा, कोपर दुखते आहे हो,' ती म्हणाली.

'घरी गेल्यावर आयोडाईन लावीन हो.'

'ते झोंबेल.'

'जरा झोंबेल. मग बरे वाटेल.'

'चला आता! पुरे खेळ बाबा.'

'कंटाळलीस ? चला तर.'

गाडी जोडली गेली. गाडीत गादी, दोन तक्के ठेवण्यात आले. जहागीरदारांनी दोघांना फुलांचे गुच्छ दिले.

'खरे, मीसुद्धा एक करून ठेवला होता.' चित्रा आठवण आल्यासारखे करीत म्हणाली.

'मग जा, तो घेऊन ये.' बाप म्हणाला.

'नको आता. हा एक पुरे. तो राहू दे येथेच. नाही तर यांना होईल.'

इतक्यात चारू तो गुच्छ घेऊन आला व चित्राला देऊ लागला.

'अहो, मीच तो केलेला. मीच केलेला मला काय देता ? तुम्हालाच घ्या तो.' ती म्हणाली.

'आणि तुम्हाला आत्ता मी दिले ते चारूनेच केलेले होते.' जहागीरदार म्हणाले.

'परंतु मी केलेला अधिक सुंदर आहे.' ती म्हणाली.

'बायकांना अधिक कला असते.' चारू म्हणाला.

'अच्छा, फार मौज आली.' बळवंतराव म्हणाले.

'तुमची मौज, मी मात्र पडल्ये, दुखावले.' चित्रा म्हणाली.

'परंतु मळा आवडला ना?' जहागीरदारांनी हसत विचारले.

'हो! फार आवडला.'

'येत जा अशी मधूनमधून.' जहागीरदार म्हणाले.

गाडी निघाली. जहागीरदार व चारू थोडे अंतर पोचवीत आले व नमस्कार करून मागे वळले.

चित्रा व बळवंतराव घरी आली. चित्रा झोक्यावरून पडल्याची हकीगत सर्वांना समजली. कपाळाला रुमाल बांधलेला होताच. श्यामू, रामू, दामू सारे ताईची थट्टा करू लागले.

'ताई, तुलां दाखवायला ना नेले होते?' श्यामूने विचारले.

'सासूने मारले वाटते?' रामू म्हणाला.

'लग्न नाही झाले, तोच कशी सासू मारील ?' रामू, आधी लग्न ठरावे लागते. मग होईल. मग सासू मारील. होय ना ग आई ?' श्यामूने जरा प्रौढपणे जणू विचारले.

'परंतु ताईला चांगलीच सासू मिळेल.' सीताबाई म्हणाल्या.

'निदान नवरा तरी चांगला मिळेल.' बळवंतराव म्हणाले.

'ताई, तू बऱ्याच उंचावरून पडलीस ?' रामूने विचारले.

'हो.' ती म्हणाली.

'तू रडली असशील !' दामू म्हणाला.

'मग डोळे कोणी पुसले ?' रामूने विचारले.

'नवऱ्याने !' श्यामू हसून म्हणाला.

'परंतु लग्न झाले म्हणजे तो खरा नवरा. तूंच ना म्हटलेस ?' रामू म्हणाला.

'जा ना रे बाहेर. तिला पडू दे आणि ताईच्या लग्नाची अशी टिंगल का करायची ? पुन्हा भलभलते बोलाल तर बघा.' बळवंतराव जरा रागाने म्हणाले.

ती मुले बाहेर गेली. चित्रा आपल्या खोलीत जाऊन अंथरुणावर पडली. ती रडत होती. का बरे ? तिचे का कोपर जास्त दुखत होते ? कपाळाची जखम दुखत होती ?

रात्री सीताबाई व बळवंतराव बोलत होते.

'ती दोघे एकमेकांजवळ बोलली. एकमेकांना आवडली. मोकळी आहेत त्यांची मने. चारू खरेच सुंदर मुलगा आहे. जमले तर आपली चित्रा द्यावी तेथे.' बळवंतराव म्हणाले.

'माझी हरकत नाही. जहागीर आहे. एकुलता एक मुलगा आणि मुलगाही फार चांगला आहे म्हणता.' सीताबाई म्हणाल्या.

'स्वरूपाने सुंदर व गुणांनीही सुंदर आहे. असा मुलगा मी पाहिला नाही आणि चित्रा व तो चारू, जणू पूर्वीची ओळखीची अशा तऱ्हेने बोलत होती. काय ऋणानुबंध आहे कळत नाही. आपली तरी इकडे लांब बदली होईल असे कोणाला वाटले होते ? जणू चित्राच्या लग्नासाठीच देवाने आणले असे आपले मला वाटते. जमले तर करावे ना ? का नको इतक्यात ?'

‘आता काही तशी लहान नाही चित्रा. तिला सारे समजते. कशाला लांबवा? वेळीच सारे बरे असे मला वाटते. उगीच लांबवण्यात अर्थ नाही.’ सीताबाई म्हणाल्या.

पुढे काही दिवसांनी बळवंतरावांनी जहागीरदारांना खरेच विचारले.

‘तुमचा चारू तयार आहे ना?’ बळवंतरावांनी प्रश्न केला.

‘तो तयार आहे, कारण आपल्या आईजवळ तो तसे बोलला. करीन लग्न तर चित्राशीच, असे त्याने सांगितले.’ जहागीरदार म्हणाले.

‘तुम्हालाही पसंत आहे ना?’

‘अहो, अशी नक्षत्रासारखी मुलगी कोणाला सून म्हणून आवडणार नाही? चारूच्या आईचीच जरा समजूत घातली पाहिजे.’

‘तुम्हाला हुंडा हवा असेल तितका देईन. एकदा माझ्या चित्राला चारू वर मिळो हीच इच्छा.’

‘अहो, हुंडा नकोच. आम्हाला का काही कमी आहे? आणि चारूने हुंडा घ्यायचा नाही ही गोष्ट मला कधीच सांगितली आहे. हुंडा घेईन तर चारू पळून जाईल. तुम्हाला काय द्यायचे ते तुम्ही प्रसन्नपणे चारूला व चित्राला द्या. रावसाहेब, माझे खरोखर भाग्य की, तुमच्यासारख्या सज्जनांशी संबंध जोडण्याची संधी मिळाली. मी चारूच्या आईची समजूत घालीन. आपण ठरवून टाकू. समजून चला की, ठरले असे.’ जहागीरदार म्हणाले.

चित्राच्या लग्नाच्या गोष्टी सर्वत्र पसरल्या. ती आता शाळेत जाईना. मुले मोठ्याने बोलून चिडवीत. ती घरीच वाची. घरीच राही.

तिकडे चारूच्या आईची समजूत घालणे चालले होते.

‘मला काही ही मुलगी पसंत नाही. चारू, तू लहान होतास तेव्हापासून माझ्या मैत्रिणीला मी सांगितलेलं आहे की, तुला मुलगी झाली तर माझ्या चारूला करीन. का रे नाही ती तुला पसंत?’ चारूच्या आईने विचारले.

‘मला ती नको वाटते.’ चारू म्हणाला.

‘अग, पण चारूला जर ही चित्रा पसंत आहे, तर तू का आड येतेस? त्यांना जन्म काढायचा आहे.’ जहागीरदार म्हणाले.

‘ही चित्रा म्हणे फार फटाकडी आहे. चारूजवळ मळ्यात आपली एकदम हसू- बोलू लागली आणि मुसलमानांशी म्हणे तिची मैत्री. मुसलमानांच्या मुली

मैत्रिणी! त्यांच्याकडे विडे खाते. नको ही असली मुलगी. आपण खेड्यातील माणसे. ह्या अशा लाडावलेल्या व शेफारलेल्या मुली उद्या वाटेल ते करतील. तोंडाला काळेही फासायच्या. माझे ऐका. चारू, आईचे ऐक. ती माझ्या मैत्रिणीची मुलगी कर.' आईने पुन्हा जोरदार सांगितले.

'का ग आई, तुझ्या माहेरी नाही वाटते मुसलमान येत? तुमच्याकडे तर मुसलमानांशीच व्यवहार. मी आजोळी येतो तेव्हा बघतोच सारे. मुसलमान वाईट, तर आजोळी कशाला त्यांच्याशी व्यवहार करतात? उगीच काही तरी तू बोलतेस. त्या चित्राची एक मुसलमान मैत्रीण तिच्या वर्गातील होती. ती देई एखादे वेळेस तिला पट्टी. दुसरे कोणी मुसलमान नव्हते देत. तिने मोकळेपणाने मळ्यात सांगितले. गड्यांनी येऊन तुला सांगितले? तुझे हेर पाठविले होतेस वाटते मळ्यात, आम्ही काय काय बोलतो, काय काय करतो, किती हसतो ते पाहायला? आई, माझे लग्न करायचेच असेल तर चित्राजवळच करा. माझ्या जीवनाच्या दिवाणखान्यात चित्राचाच प्रवेश. दुसरे कोणी नको तेथे डोकावायला.'

'बरे हो चारू, तुमचे ठरले असेल तर मी कशाला आड येते!'

'मग ठरवू ना मुहूर्त?' जहागीरदारांनी विचारले.

'बाबा, हुंडा नको हो.' चारूने सांगितले.

'नाही हो.' ते म्हणाले.

बळवंतरावांच्या विचाराने जहागीरदारांनी मुहूर्त ठरविला.

'तुमच्या खेड्यात आम्ही येऊ की तुम्ही निर्मळपूरला याल?' बळवंतरावांनी विचारले.

'जशी तुमची इच्छा.'

'चित्रा तर म्हणते की, तुमच्या गावीच लग्न व्हावे. त्या मळ्यात आम्ही जानोशाला उतरू. मळ्यात आमचा मंडप.'

'जशी तिची इच्छा.' जहागीरदार म्हणाले.

आणि ज्या मळ्यात चित्रा व चारू यांची प्रथम भेट झाली, दृष्टादृष्ट झाली, ज्या मळ्यात तिने झोके घेतले, त्याच मळ्यात सुंदर मंडप घालण्यात आला. मोठ्या थाटाने लग्न झाले. शेतकऱ्यांस मेजवानी देण्यात आली. निर्मळपूरचेही

पुष्कळ प्रतिष्ठित लोक आले होते. फातमाचे प्रेमळ पत्र व लग्नभेट आली होती. चित्रा व चारू यांनी परस्परांस माळा घातल्या. सर्वांना आनंद झाला.

लग्न झाले. सारी मंडळी परत आली. चित्रा सासरीच राहिली. एके दिवशी चित्रा व चारू त्या मळ्यात झोके घेत होती.

'पडेन हो मी चारू. नको, मला भीती वाटते.'

'त्या दिवशी तू एकटी होतीस. आज आपण दोघे मिळून झोके घेऊ. मी तुला पडू देणार नाही.'

'त्या दिवशी रे मग का नाही बरोबर आलास?'

'तू का नाही बोलावलेस?'

पतिपत्नीचे असे प्रेमळ संवाद चालले होते आणि त्या झोक्यावर दोघे चढली. चारूने खूप उंच चढविला झोका.

'पुरे, मला भीती वाटते चारू.'

'बरे पुरे!'

आणि थांबला झोका. दोघे खाली उतरली. मळ्यात फिरली.

'हा मळा तुला फार आवडत होता ना?'

'चारू, तुझा हा मळा म्हणून आवडतो हो.'

'चित्रा, आपली का पूर्वजन्मीची ओळख होती? पूर्वजन्मीही का आपण एकमेकांची होतो? आपणास परकेपणा अगदी वाटत नाही. खरे की नाही?'

'होय हो चारू, तुला जणू शोधीत मी या बाजूला आल्ये.'

'तू उद्या घरी जाणार ना?'

'चारू, आता तुझे घर ते माझे घर.'

'अग घरी म्हणजे माहेरी.'

'हो, उद्या बाबा नेणार आहेत.'

'केव्हा येशील परत?'

'चारू, आता मी तुझीच आहे. येईन लौकरच.'

'तुझ्या फातमाला आपला दोघांचा फोटो पाठवलास का?'

'पाठवणार आहे. फातमा आपल्या नवऱ्याबरोबर दूर गेली आहे. तुमचे आजोळ आहे ना? त्याच बाजूला फातमा गेली आहे कोठे तरी.'

'पुष्कळच लांब!'

'आपण जायचे का फातमाकडे?'

'परंतु तिच्या नवऱ्याला थोडेच आवडेल? चित्रा, लहानपणचे पुष्कळसे शेवटी मनातच ठेवावे लागते.'

'चित्रा, तुला एक सांगून ठेवतो. आई काही बोलली तरी मनावर नको घेऊ तू. माझ्याकडे बघ. आईचेही मन पुढे निवळेल. तीही तुझ्यावर प्रेम करील. चित्रा, तुझ्यावर कोण नाही प्रेम करणार? तू गुणी आहेस. प्रेमळ, हसरी, मोकळी आहेस.'

'होय हो चारू. खरोखरच तू मला मिळणे म्हणजे पूर्वपुण्याई. चारू, माझ्यापेक्षा तूच सुंदर आहेस. तूच गुणी आहेस. चित्रा साधी मुलगी.'

'साधीच मला आवडते. फुलांवर प्रेम करणारी फुलराणीच मला आवडते. चल तुला नटवतो फुलांनी.'

आणि त्याने तिच्या केसांत फुले घातली. दोघे घरी आली. चित्रा पुढे माहेरी गेली. चित्रा अत्यंत आनंदात होती.

❋ ❋ ❋

शेतकरी, विणकरी, रंगारी, पिंजारी, सोनार, सुतार, लोहार कुंभार– सर्व

चित्रा नि चारू : प्रकरण चौथे

सासूने चालवलेला छळ

चित्रा नि चारू परस्परांस अनुरूप होती. सुखाला वास्तविक तोटा नव्हता; परंतु सासू मनात चरफडत होती. चित्रा नि चारू यांचा बेबनाव व्हावा असे तिला वाटत होते. चारूच्या मनात चित्राबद्दलचे जे अपार प्रेम होते ते नष्ट व्हावे असे तिला वाटत होते. चारूने चित्राचा त्याग करावा आणि आपल्या मैत्रिणीच्या मुलीशी त्याचे दुसरे लग्न लावावे असे ती मनात योजीत होती.

चित्रा सुखात वाढलेली होती. फारसे कामकाज करण्याची तिला सवय नव्हती; परंतु गोडगावला पिठाची गिरणी नव्हती. घरीच दळावे लागे. मोलकरणी दळीत, परंतु सासू मुद्दाम चित्राला दळायला लावी. चारू शेतावर गेलेला असावा आणि इकडे सासूने दळण द्यावे.

'लौकर दळ. चारू शेतावरून यायच्या आधी झाले पाहिजे. समजलीस? तुम्ही शहरच्या पोरी; परंतु येथे खेड्यात नाही हो नुसते बसून चालणार. येथे चार धंदे करायला हवेत. चांगले बारीक दळ. परवा पसाभर फक्त डाळ दिली हरभऱ्याची दळायला, तर नुसता भरडा काढून ठेवलास आणि चारूला हात दाखवलेस वाटतं? जसे फोडच आले असतील हातांना! आम्ही पायली पायली हातांनी दळतो. मोठी नाजूक राणी. कोणा कलेक्टराशी बापाने लावायचे होते लग्न. येथे गांवढ्यात कशाला दिली? तरी मी पहिल्यापासून सांगत होते की, शहरी मुलगी करू नका; परंतु या चारूचा चावटपणा. येतील म्हणावं अनुभव. हा चारूच उद्या म्हणेल की, नको ही बया. नखरेबाज चढेल मुलगी कोणाला आवडेल? घे की ते दळायला! रडायला काय झाले? ढोंगे येतात करायला.'



सासूचा पट्टा चालला होता. चित्राने जाते घातले. ती दळीत होती. दोन्ही हातांनी दळीत होती. तिला जाते ओढेना. तरी कष्टाने दळीत होती. इतक्यात शेतावरून चारू आला. तो चित्रा तेथे दळीत आहे. डोळ्यांत पाणी आहे.

'चित्रा, ये. आपण दोघंजणं मिळून दळू. ये. रडू नकोस आता. हस.'

'चारू, नको, तू जा. सासूबाई रागावतील. माझी लाज राख. जा.'

'मी नाही जाणार. मी तुला हात लावणार.'

'नको रे चारू. माझी फजिती का करायची आहे? गडीमाणसे येतील, मोलकरणी येतील. मला हसतील. म्हणतील, त्यांना दळायला बसवलंन्. जा हो चारू. तुझे माझ्यावर प्रेम आहे, ते दळायला लागून नको हो दाखवायला. जा, जा.'

'मी जाणार नाही. घाल दाणे.'

'हट्टी आहेस तू चारू.'

'आणि तूही हट्टी आहेस.'

'बरे ये. दळू दोघं. तू गेलास म्हणजे सासूबाई याचे उट्टे काढतील.'

'तू आपली नेहमी माझ्याबरोबर राहात जा.'

'नेहमी कशी तुझ्याबरोबर येऊ? असा काय धरतोस खुंटा?'

'तुला तरी कोठे माहीत आहे? दळले आहेस का घरी कधी?'

दोघे दळत होती. चित्रा आनंदली होती.

'चित्रा, ओवी म्हण की. बायका ओव्या म्हणतात.'

'मला नाही येत.'

'एकदोन तरी येत असतील हो. म्हण.'

आणि चित्राने ओवी म्हटली,

दळण दोघे दळू, हात दोघांचे लागती
चित्रा नि चारू यांची, एकमेकांवरी प्रीती॥
एकमेकांवरी प्रीती, वाणीने मी वर्णू किती
एकमेकांच्या हृदयी, एकमेकांची वसती॥
चारुराया चित्रा शोभे, जशी चंद्राला रोहिणी
पतीला ती निज प्रेमे, घाली सदैव मोहिनी॥

अशा ओव्या चालल्या होत्या. तो सासूबाई आल्या.

'झालं का ग दळण? आणि हे काय? चारू, तू का दळत बसलास? अरे, तुला लाज कशी नाही? इतका काय बाईलवेडा! साहेब नि मड्डम जणू! दळू दे तिला. काही मरत नाही पसाभर दळून. ऊठ. सारा गाव तोंडात शेण घालील. गडीमाणसे काय म्हणतील? आणि हिने तुला बोलावले असेल. लाज नाही मेलीला. केव्हाचे दळायला दिले आहे. तरी सांगितले होते तीनतीनदा बजावून की, तो शेतावरून यायच्या आधी आटप म्हणून. ऊठ हो.'

'आई, अग दळले जरा म्हणून काय झाले? व्यायाम होतो.'

'इतके दिवस नाही कधी दळायला आलास तो. आईला हात लावला होतास का दळताना कधी? बायकोवर माया. काल आली नाही तर तिच्याबरोबर दळायला लागला. आईने जन्मभर खस्ता खाल्ल्या त्याचे काहीच नाही.'

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

'चारू, जा हो तू.' हळूच चित्रा दुःखाने म्हणाली. चारू उठून गेला. चित्रा दळत बसली. तिने कसेबसे दळण संपवले. आज तिच्या हाताला खरेच फोड आले. पुन्हा दुपारी भांडी घासायची. फोड झोंबत. चित्राला रडू येई.

असे दिवस जात होते आणि त्यातच दुःखाची गोष्ट म्हणजे चित्राच्या वडिलांचीही दूर बदली झाली. त्या दिवशी ती माहेरी गेली होती. वडील जाणार होते. सारी भावंडे जाणार होती. चारूही आला होता.

'आजच येतेस का?'

'आज नको. पण मला न्या हो.'

'नेईन हों बाळ. तुझे कसे चालले आहे? सासूबाई आताशा कशा वागतात?'

'सासूबाईंशी मला काय करायचे आहे? माझे माणूस मोलाचे आहे. लाखात असे सापडायचे नाही. बाबा, खरेच हो, चारू म्हणजे प्रेमसिंधू आहे. तुम्ही काळजी नका करू. पत्र पाठवीत जा हां मला.'

'पाठवीन हो.'

इतक्यात श्यामू, रामू, दामू आले.

'ताई आम्ही चाललो.'

'आता भाऊबीजेला या.' ती म्हणाली.

'तू ये आमच्याकडे. तुझ्याकडे आम्ही आलो तर तुझी सासू मारील. ताई, मारकुटी आहे का ग ती? तुला खरेच ती मारते?' रामूने विचारले.

'नाहीहो मारीत... त्यासुद्धा आता प्रेम करतात माझ्यावर. असे बोलत नका जाऊ हो कोठे.' आणि चित्रा उठून गेली. आईजवळ गेली. सीताबाई आवराआवर करीत होत्या.

'चित्रा, सांभाळ हो. सासूचा स्वभाव निवळेल हो. असतात काही खाष्ट सास्वा; परंतु पुढे त्याही चांगल्या वागू लागतात. तुला मूलबाळ झाले म्हणजे सारे ठीक होईल. आजीच्या मांडीवर नातवंड खेळू लागले म्हणजे नातवंडाची आईही मग आवडू लागते.'

'आई, तू चिंता नको करू. मला किती त्रास झाला तरी चारू दोन शब्द बोलला की, मी पुन्हा हसू लागते.'

'असेच तुमचे प्रेम राहो.'

इतक्यात चारू तेथे आला.

'आमची चित्रा सांभाळा हो.' सीताबाई म्हणाल्या.

'मला सांभाळण्यापेक्षा तिला अधिक सांभाळीन. खरे ना चित्रा ?'

'खरे हो.'

'चित्रा, चल आपण स्टेशनवर पुढे जाऊ, तिकिटे काढू. येतेस ?'

'चला जाऊ.'

दोघे स्टेशनवर गेली. त्यांनी तिकिटे काढली. सामान आले. काही आधीच पाठवून दिले होते मालगाडीने. हे सारे बरोबर न्यायचे होते. सारी मंडळी आली. गावातीलही काही मंडळी आली होती. शिपाई आले होते. बळवंतराव लोकप्रिय होते. निरोप द्यायला शेवटी शेवटी बरीच गर्दी झाली. कोणी माळाही घातल्या. कोणी भेटी आयत्या वेळेस आणल्या. आता थोडा होता वेळ. श्यामू, रामू, दामू बसले गाडीत. सीताबाई बसल्या. बळवंतरावही बसले.

चित्रा व चारू खाली उभी होती. शिट्टी झाली.

'जपा हो.' बळवंतराव म्हणाले.

'ताई, चाललो.' भावंडे म्हणाली.

'जप हो.' सीताबाई स्फुंदत म्हणाल्या.

चित्राला बोलवत नव्हते. सुटली गाडी. चित्रा व चारू परतली. गाडी घेऊन ती आली होती. बसली दोघे घोड्याच्या गाडीत व निघाली. गडी हाकलीत होता. चारू व चित्रा आत होती. चित्राच्या डोळ्यांत राहून राहून पाणी येत होते.

'चित्रा, उगी, रडू नको. मी आहे ना ?'

'होय हो चारू; परंतु वाईट वाटते हो.'

'वाईट वाटायचेच.'

गाडी घरी आली नाही तो सासूची गर्जना सुरू!

'म्हटलं येता कीं नाही घरी की, राजाराणी जातात पळून ? किती हा उशीर ! चारू, तू अगदी नंदीबैल होणार की काय ? ती नाचवील तसा तू नाचतोस. सिनेमा पाहून आला असाल ? उगीच नाही इतका उशीर झाला. शहरातल्या सवयी. सिनेमे हवेत आणि सिनेमातल्यासारखे उद्या करालसुद्धा.'

'आई, अग गाडीची वेळ बदलली आहे. गाडी सुटली नि तश्शी परत आलो. का उगीच बोलतेस ? आता आम्ही का कुकुली बाळे ? पाहिला सिनेमा म्हणजे का पाप झाले ? तूसुद्धा मधूनमधून पाहातेस.'

'परंतु देवाधर्माचे आम्ही पाहातो.'

'आम्ही वाटते वाईट असतात तेच पाहातो ? काही तरी आपले बोलतेस.'

'बरे हो, नाही बोलणार. तुम्ही आता मोठी झालात. कोण बोलणार तुम्हाला ? वाटेल तशी नाचा. उद्या तोंडाला काळे फासू नका म्हणजे झाले.'

असे दिवस जात होते आणि चारूला कोठेतरी लांब जायचे होते. महत्त्वाचे काम होते.

'चारू, जाशील ना तू?' बापाने विचारले.

'होय बाबा, हवे ना जायला ?'

'हो. तू नाही तर मी गेले पाहिजे. मला जरा बरे नाही वाटत. तू ये जाऊन.'

'बरे.'

चित्राला वाईट वाटत होते. चारू तिला धीर देत होता.

'चित्रा, तुलासुद्धा मी बरोबर नेले असते, परंतु ते बरे नाही दिसणार. मी लौकरच येईन. आईला सांगून ठेवीन आणि जरा धीटपणाने वाग. आई बडबड करील तिकडे लक्ष नको देत जाऊ हो.'

'चारू तू जवळ नसलास म्हणजे माझा जीव खालीवर होतो. पाण्याविणे मासा तसे होते. तूच हो एक माझा आधार. तुझ्याशिवाय मला कोण आहे ? तू माझे जग, तू माझा देव. वाटते की, तू नि मी कोठे तरी दूर दूर जावे. नको हे जग. दुष्ट जग!'

'चित्रा, हे जग का दुष्ट आहे? या जगातच तू नि मी आहोत. तुझी फातमा आहे. तुझे आईबाप, भावंडे, सारी आहेत. जगात बरे, वाईट सारे आहे. बऱ्याकडे लक्ष देऊन आशेने व आनंदाने राहावे.'

'राहीन हो आनंदाने. ये जाऊन.'

चारू गेला. चित्राची आता दीनवाणी स्थिती झाली. जहागीरदारही चार दिवस निर्मळपूरलाच औषधासाठी जाऊन राहिले. घरी केवळ सासूचे राज्य. चित्राचे हाल आता कुत्रा खाईना. तिला पहाटे सासू उठवी. खटाळभर भांडी घासायला लावी. धुणी धुवायला लावी. तिला शिळे खायला वाढी. दळायला लावी आणि शिव्या येता जाता आहेतच.

रात्री बारा वाजता थकलीभागलेली चित्रा आपल्या शयनमंदिरात जाई; परंतु एके दिवशी सासू म्हणाली,

'वर नाही निजायचे! खालीच स्वयंपाकघरात झोपत जा. गाद्या हव्यात लोळायला. तो येईपर्यंत नाही वर झोपायचे. समजलीस? त्या खोलीला मी कुलूपच लावत्ये.' आणि खरेच त्या सासूने चित्राच्या खोलीला कुलूप लावले. क्षणभर जाऊन बसायला, रडायला जागाही नाही. स्वयंपाकघरातच तिला निजावे लागे. तेथे ओल असे. डास असत. निजायला फटकूर मिळे. पांघरायलाही धड नाही. अरेरे, चित्रा. काय ही तुझी दशा!

परंतु सासरा निर्मळपूरहून परत आला.

'चित्रा, तुझ्या खोलीला कुलूपसे?'

'सासूबाई म्हणतात खालीच निजत जा.'

'दुष्ट आहे ती. मी सांगतो हो तिला.'

आणि सासऱ्याने सांगितले.

'काही नको वर निजायला! मला या मुलीचा काडीचा भरंवसा नाही. घरात तुम्ही नव्हतात. चारू नाही. ही आपली दिवसासुद्धा वर जाऊन गादीवर लोळायची. लाजच नाही मेलीला. म्हणून कुलूपच लावले. वर गेलीस तर तंगडी तोडीन म्हटले. खाली अस माझ्या डोळ्यांसमोर, उद्या काही केलेन् नि तोंडाला काळे फासलेन् तर करता काय? यांचे होतील खेळ, आपली मान खाली. तुम्ही म्हणत असाल तर उघडते कुलूप. लोळे की नाही! माझे काय जाते? आणखी म्हणावं चार गाद्या घाल.'

चित्राचे मंदिर उघडले. त्या दिवशी रात्री चारूचा फोटो जवळ घेऊन ती रडली.

'चारू, ये रे लौकर परत. तू येईपर्यंत मी जिवंत तरी राहीन की नाही कोणास ठाऊक! परंतु तुझ्यासाठी मला जगले पाहिजे. मी गेल्यावर तू रडशील, दुःखी होशील, जगेन हो. तुझ्यासाठी जगेन चारू, तुझाच एक मला आधार आहे हो.'

असे त्या फोटोला हृदयाशी धरून ती म्हणत होती.

चित्रा अशक्त झाली. आजाऱ्यासारखी दिसू लागली; परंतु चारू आला. चित्राची दशा पाहून त्याला वाईट वाटले.

'चित्रा, आईने तुझे हाल केले. होय ना?'

'नाही हो चारू. ज्या मातेच्या पोटी तुझ्यासारखे रत्न आले, तिला मी कशी नाव ठेवू? सासूबाईंचे माझ्यावर अनंत उपकार आहेत. तुझी देणगी त्यांनी मला दिली आहे. त्यांनी किती छळले, किती त्रास दिला, तरी तो मला गोड करून घेतला पाहिजे. कारण तुझे जीवन त्यांनी मला दिले आहे. चारूचे पृथ्वीमोलाचे रत्न जिने माझ्या पदरात घातले, तिला मला दोन शब्द बोलण्याचा अधिकार आहे. खरे ना चारू?'

'चित्रा, कोठे शिकलीस असे बोलायला?'

'तुझे प्रेम शिकवते. तुझा फोटो मला शिकवी.'

'तू इतकी अशक्त कशी झालीस?'

'तू येथे नव्हतास म्हणून. तुझे दर्शन म्हणजे माझा खरा आहार. तुझे दर्शन म्हणजे अमृत. तू येथे असलास म्हणजे मला अन्न गोड लागते. तू नसलास म्हणजे सारे कडू वाटते. घास जात नाही मग. म्हणून हो मी अशक्त झाल्ये.'

'तुला मी टॉनिक आणीन.'

'वेडा आहेस तू.'

'तू घेतले पाहिजेस.'

'चारू, माझे टॉनिक तू हो. तू आलास. आता बघ माझी प्रकृती सुधारेल.'

'तरीसुद्धा टॉनिक घे. माझ्यासाठी घे.'

'तुझ्या आनंदासाठी घेईन. चारू, तुझ्यापुढे मला नाही म्हणता येत नाही. तुझी इच्छा म्हणजे माझा धर्म. तुझी इच्छा म्हणजे माझा कायदा.'

'चित्रा ही गुलामगिरी आहे. तू का माझी गुलाम आहेस?'

'वेडा आहेस तू चारू? फातमा कबिराचे एक गाणे म्हणे. कबीर देवाला म्हणतो,

'मैं गुलाम मैं गुलाम मैं गुलाम तेरा।
तू साहेब मेरा॥'

चारू, रामाचे दास होणे म्हणजेच मुक्त होणे. कधी कधी दास्य म्हणजेच मुक्ती असते, कारण ते दास्य स्वेच्छेचे असते. लादलेले नसते. चारू, तू ज्याला गुलामगिरी म्हणतोस त्याला मी आत्मसमर्पण म्हणते व समर्पण, स्वत:चे समर्पण हेच माझे समाधान. समजले ना?'

* * *

चित्रा नि चारू : प्रकरण पाचवे

चित्रावर संकट

चित्रा काही दिवस माहेरी गेली होती. आईच्या हातचे खायला गेली होती. प्रेमळ वातावरणात गेली होती. तिची प्रकृती बरी होती. सासूने हाल केले वगैरे तिने काही सांगितले नाही.

'आई, फातमाचा लागला का ग पत्ता?' तिने विचारले.

'लागला असता तर कळवला असता. तिचे आजोबा वारले. लग्न झाल्यावर ती नवऱ्याकडे गेली; परंतु नवरा कोठे असतो कळले नाही.'

'आई, आता परत कधी मला आणाल?'

'बाळंतपणासाठी ये.'

'आई, तुला मी एक सांगू?'

'काय ग?'

'काही नाही.'

'सांग. का नाही सांगत?'

'मनात येते एखादे वेळेस की, पुन्हा तुमची-माझी भेट होणार नाही. कदाचित मी मरेन.'

'हे काय वेडे वेडे मनात आणतेस? असे नको हो मनात आणू. चांगला नवरा मिळाला आहे. सुखाचा संसार कर. आज ना उद्या मूलबाळ होईल. सारे चांगले होईल. वेडी आहेस तू चित्रा!'

'आई, मनात येते ते सांगूही नये का? तू मायेची म्हणून तुझ्याजवळ म्हटले.'

'परंतु आनंदात राहा. समजलीस? तुला लवकर लवकर आणीत जाऊ हो. बाळंतपणालाच येशील असे वाटले होते, परंतु एखादीला नाही होत लवकर

मूल. म्हणून का कंटाळलीस ? का सासू काही म्हणाली ? होईल मूल. अजून का वय गेले ? हे सतरावे वर्ष. चांगली हस, खेळ. मनाला नको बाई लावून घेऊ.'

चित्रा उठून गेली. माहेरी ती लोकरीचा स्वेटर करीत होती. चारूसाठी स्वेटर. त्यात तिचा वेळ जाई. स्वेटर तयार झाला. सासरी जायची वेळ आली. चारू न्यायला आला होता. चार दिवस आनंदात गेले. मेजवानी झाली.

'स्वेटर घालून पाहा ना.'

'घरी गेल्यावर घालीन.'

'चारू, जेथे तू नि मी आहो येथे आपले घरच. येथे आहोत ना आता दोघे, मग येथे घर. घाल. मला बघू दे.'

चारूने स्वेटर घातला.

'छान दिसतो तुला !'

'आता कोणाला करशील ?'

'पुढे कधी बाळ होईल, त्याला करीन.'

'मला आला असता, तर मी तुझ्यासाठी केला असता. खरेच !'

'वेडा आहेस तू चारू. बायकांचा जन्म का नाही घेतलास ?'

'पुढच्या जन्मी आपण अदलाबदल करू.'

'चारू, उद्या निघायचेच का ?'

'झाले आता चार दिवस. पुरे नाही का ?'

'होय हो. पुरे. जाऊ हो उद्या.'

चित्रा व चारू गोडगावला आली. सासूबाईंचा स्वभाव अद्याप पूर्ववतच होता. चित्राला मूलबाळ होणार नाही, तू दुसरे लग्न कर, असा आग्रह सासूचा चारूला सुरू झाला होता; परंतु चारू तिकडे लक्ष देत नसे.

परंतु अकस्मात् चमत्कार झाला. सासू आता चांगली वागू लागली. चित्रावर पोटच्या मुलीवर करावी तशी माया सासूबाई करू लागल्या. त्यांनी तिच्यासाठी लाडू केले. तिला उजाडत लाडू खायला देत. तिला आता काम सांगत नसत. गोड बोलत. तिला जवळ घेत.

'चित्रा, उगीच तुला त्रास दिला हो. जा हो ते विसरून. यापुढे तुला जणू मुलगी मानीन. तुला लागेल ते माग. समजलीस ना! प्रकृतीची काळजी घे. चारू तुला टॉनिक देत असे मागे, त्याची बाटली आणवू का पुन्हा?'

'नको हो आई. आता बरी आहे प्रकृती, तुम्ही प्रेम द्या म्हणजे सर्व काही मिळाले.'

'देईन हो बाळ.'

आता अगदी शुक्लपक्ष होता. चित्राच्या संसारात प्रेमाचे व सहानुभूतीचे चांदणे होते. दुःख, शोक, चिंता यांना जागा नव्हती.

'चित्रा, मी नव्हतो सांगत की, आई पुढे निवळेल म्हणून?'

'मलाही वाटत होते की, ज्यांच्या पोटी चारू येतो त्या कायमच्या कठोर कशा राहातील?'

'आता तू सुखी आहेस ना?'

'चारू, ज्या दिवशी मी पुत्रवती होईन, त्या दिवशी खरी सुखी होईन. तुझ्या मांडीवर बाळ देईन, तेव्हा मी धन्य होईन.'

'तीही इच्छा देव पुरवील.'

काही दिवस, काही महिने, असे आनंदात गेले. एके दिवशी सासूबाई सुनेजवळ काहीतरी बरेच बोलत बसल्या होत्या. कशाविषयी होते ते बोलणे? चला आपण ऐकू. कळेल धागादोरा.

'येशील ना माझ्याबरोबर? येच. माझ्या माहेरच्यांची खूप दिवसांपासूनची इच्छा आहे. कितीदा तरी त्यांची पत्रे आली की, येताना चित्राला पण घेऊन ये म्हणून. ये माझ्याबरोबर. जरा तुला थारेपालट होईल. माझे माहेर फार छान आहे. मोठा गाव आहे. गावाबाहेर देवीचे देऊळ आहे. जंगलात आहे. तेथे तू, मी जाऊ. देवीला मुलासाठी नवस करू. ती देवी नवसाला पावते. पुत्रदादेवी असेच तिचे नाव आहे. तुला मूलबाळ होत नाही, म्हणून चारूसुद्धा खिन्न असतो. आपण जाऊ. त्या देवीला जाऊ.'

'येईन मी आणि तुम्ही एकट्या गेल्यात तर मला येथे करमायचे नाही. तुमचा हल्ली लळा लागला आहे मला. माहेरची आठवण खरेच हो तुम्ही मला

होऊ देत नाही. म्हणून तुम्हाला हल्ली मी आईच म्हणते. त्यांची आई ती माझीही आईच. येईन मी. देवीच्या पाया पडू.'

चित्राने चारूला ते सारे बोलणे सांगितले.

'चित्रा, तुझा का अशा नवसांवर विश्वास आहे?'

'चारू, जगात चमत्कार नाहीत असे नाही. तुझे-माझे लग्न हाही एक चमत्कारच नाही का? कोठले दोन जीव आणि कसे एकत्र आले! आपण जर जरा खोल पाहू तर सर्वत्र चमत्कारच दिसतील. चारू, मी लवकर परत येईन. सासूबाई राहातील. तू येशील ना मला न्यायला?'

'पत्र पाठव म्हणजे येईन. चित्रा, मला का नाही घेऊन जात?'

'चारू, तू विचार ना सासूबाईंस.'

'परंतु मला तिकडे यायला आवडत नाही.'

'मला ते ठाऊक आहे. ती मुलगी तिकडे आहे म्हणून ना?'

'तुला कोणी सांगितले?'

'साऱ्या जगाला माहीत आहे.'

एके दिवशी सासूबाईंच्या माहेरचे कोणीतरी त्यांना न्यायला आले होते. सासूबाई निघाल्या. चित्राचीही तयारी झाली.

'चित्रा, लौकर ये हो.'

'चारू, प्रकृतीस जप.'

'माझ्या प्रकृतीची काळजी तू घ्यायचीस, तुझ्या मी. खरे ना?'

'होय हो. मी लवकरच येईन.'

'आई, चित्राला लवकर परत पाठव हो.'

'चारू असे काय वेड्यासारखे करतोस? येईल ती. राहील आठ दिवस. कुठे परमुलखात नाही जात. तू तर आजोळी येतच नाहीस.'

'योग्य वेळी येईन.'

सासूबाई व चित्रा गेल्या. चारू आता घरी होता. चित्राच्या आठवणी काढीत बसे. मळ्यात जाऊन बसे.

सासूबाईंचे माहेर मोठे होते. कितीतरी माणसे. कोणाचा कोणाला पत्ता नसे. त्या गावात मुसलमानांचीही बरीच वस्ती होती. सासूबाईंच्या माहेरी मुसलमान येत जात. कामकाज असे, व्यवहार असे.

चित्रा कोठे बाहेर असली, म्हणजे तिची सासू सारखी तिची निंदा करीत असे. 'तिला एकटीला तिकडे ठेवणे बरे नाही. चारू एखादे वेळेस गावाला जातो, ही वाटेल त्याच्याशी हसेल, खिदळेल काय, भीती वाटते ह्या पोरीची. आपली बरोबर आणली. डोळ्यांसमोर असलेली बरी.' असे बडबडायची. एके दिवशी चित्राची सासू आपल्या मैत्रिणीकडे गेली होती. त्या दोघींचे बोलणे चालले होते.

'तुझी मुलगी मी अजून सून म्हणून करून घेईन; परंतु युक्ती करायला हवी. ही चित्रा आहे तोपर्यंत चारू दुसरे लग्न करणार नाही. तो जणू तिचा गुलाम बनला आहे. चित्राला नाहीशी केली पाहिजे. म्हणजे त्याला वाटेल की, आई म्हणत होती त्याच मुलीशी मी लग्न करावे, अशी देवाची इच्छा तर नाही ? एकदा असा विचार त्याच्या डोक्यात आला म्हणजे काम झाले.' चित्राची सासू म्हणाली.

'मला एक युक्ती सुचते.'

'कोणती ?'

'गावाबाहेरच्या देवीच्या देवळात नवसासाठी तुझी सून व तू जायचे. तेथे तिला कोणी पळवून नेईल अशी व्यवस्था करता येईल !'

'कोण नेणार पळवून ?'

'तोटा गेला !'

'कोणी मुसलमान आहे वाटते ?'

'चारूच्या आई, अहो बायका पळवून व्यापार करणाऱ्या टोळ्या असतात. त्यांत हिंदू-मुसलमान दोघेही असतात. मोठमोठ्या श्रीमंतांना, नबाबांना सुंदर बायका या व्यापाऱ्यांकडून पुरविल्या जातात. या व्यापाऱ्यांची हिंदुस्थानभर जाळी असतात. मी ती सारी व्यवस्था करत्ये.'

'आणि ही चित्रा आहे ना, ती लहानपणापासून मुसलमानांकडे म्हणे जात येत असे. तिची फातमा म्हणून एक मैत्रीण आहे. कोठे मसणात आहे ते देव जाणे. ती फातमा म्हणे हिला पानपट्टीसुद्धा करून देई. आपणाला कंडी उठवायला बरे की, एखाद्या मुसलमानाबरोबर गेली असावी. नाही का ?'

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

'हो. सारे जमेल. काहीही करून तुमच्या चारूच्या गळ्यात माझी चिंगी बांधायचीच. लहानपणापासून आपण ठरवले होते; परंतु चित्रा आडवी आली. थांब म्हणावे.'

'मग ठरवू या दिवस?'

'शुक्रवार, मंगळवार नकोत. त्या दिवशी गर्दी असते. मध्येच एखाद्या दिवशी जा. येत्या बुधवारी चालेल?'

'हो चालेल.'

'सायंकाळी हं.'

'ठीक.'

चारूची आई घरी परत आली. त्यांचे ते दुष्ट कारस्थान ठरले.

'चित्रा, उद्या बुधवारी आपण पुत्रदादेवीला जाऊ हो.'

'आजच गेलो तर? आज देवीचा वार आहे.'

'आज गर्दी असते. देवीची प्रार्थनासुद्धा नीट करायला मिळत नाही. देवीला सारे वार सारखेच. भाव हवा. वार कोणता का असेना? अंगाखांद्यावर नको हो फार घालू. जरा रानात आहे देऊळ. न जाणो, कोणी भेटायचेसुद्धा. चोरबीर नसतात म्हणा; परंतु जपलेले बरे. तेथे नटूनथटून मिरवायला थोडेच जायचे आहे?'

'उद्या किती वाजता जायचे?'

'जाऊ तिसऱ्या प्रहरी.'

'कोण कोण जाणार?'

'गर्दी नको. तू नि मी. मनापासून पाया पडू हो.'

'बरे.'

बुधवार उजाडला. आज काय असेल ते असो, चित्राला सारखी चारूची आठवण येत होती. जेवताना त्याचे घास ती घेत होती. तिच्या डोळ्यांतून मध्येच पाणी येई. आज देवीला जायचे. चारूला पत्र ठेवू का लिहून? तो का आठवण काढतो आहे माझी? त्याला लिहित्ये की आज देवीला जात आहोत. मुख्य काम झाले, ये मला न्यायला. लिहावेच असे. ती जेवण झाल्यावर एका खोलीत गेली आणि चारूला पत्र लिहीत बसली.

प्रियतम चारू,

काय रे तुला लिहू? तुझा आठवण अक्षरश: पदोपदी येते. देवीला आज जात आहे. मनोरथ पूर्ण होवोत. तू मला लवकर न्यायला ये. तुझ्याशिवाय मला चैन नाही पडत. काही सुचत नाही. तुला पुष्कळ लिहावेसे वाटते; परंतु काय लिहू? किती लिहू?

आज सारखे वाईट वाटत आहे. का बरे? तू का माझी आठवण काढून रडत बसला आहेस? वेडया, रडू नकोस. बायका रडतात. पुरुषांना रडणे नाही हो शोभत. मला लवकर ने मग आपण हसू हो. ये लौकर.

सदैव तुझी,

चित्रा

तिने पत्र पाकिटात घालून कोणाजवळ तरी टाकायला दिले.

तिसरा प्रहर झाला. देवीला जायची तयारी झाली. खण, नारळ वगैरे सारे घेण्यात आले. चारूची आई व चित्रा निघाल्या.

'बरोबर गडी न्या.' कोणी तरी म्हणाले.

'कोणी नको. दोघी जाऊन येतो. भीती थोडीच आहे?' चारूची आई म्हणाली.

गावातून दोघी बाहेर पडल्या. देवीच्या मंदिराचा रस्ता आता त्यांनी धरला. दुतर्फा झाडी होती. रस्ता चांगला होता. मोटार जाईल असा रस्ता. इतक्यात हॉर्न वाजला. कोठेतरी मोटार आहे वाटते?

चालल्या दोघी पुढे. देवीचे मंदिर आले. तो जवळ एक मोटार उभी.

चारूची आई व चित्रा मंदिरात गेल्या; परंतु इतक्यात चारूची आई काय म्हणाली, 'चित्रा, ती खाली नदी आहे. तिच्या पाण्याने हातपाय धुवून ये जा. मग देवीची ओटी भर. जा बेटा.'

चित्राला खरे वाटले. ती मंदिरातून बाहेर पडली. इतक्यात कोणी तरी एकदम तिच्या तोंडावर बुरखा टाकला. तिच्या तोंडात बोळा कोंबला गेला. ती थोडी ओरडली. धडपडली. परंतु त्या दांडग्या लांडग्यांनी त्या हरिणीला घट्ट धरली. तिला मोटारीत टाकून ते पळून गेले.

चारूची आई एकटीच रडत ओरडत घरी आली.

'काय झाले? चित्रा कोठे आहे?' सर्वांनी विचारले.

'गेली हो. कोठे गेली? मी आपली देवळात वाट पाहात आहे. हिचा पत्ता नाही. नदीवर हातपाय धुवायला गेली. बराच वेळ झाला. मी जाऊन पाहात्ये, तो कोणी नाही. तेथे डोह वगैरे नाही. खळखळ वाहाणारे गुडघाभर पाणी. कोठे गेली? का कोणाबरोबर पळाली? चारूला मी नेहमी म्हणायची की, ही बया चांगली नाही म्हणून; परंतु तो लक्ष देत नसे. तो तिला सैल सोडी. चांगले चौदावे रत्न दाखवायला हवे होते. कोठे गेली कार्टी? काळिमा फाशील सर्वांच्या तोंडाला. आता चारूला काय सांगू? काय लिहू? जा तुम्ही तरी. बघा, कोठे सापडत्ये का?' लोक शोधायला गावभर गेले; परंतु चित्राचा पत्ता नाही.

'तिने कोणाजवळ काही ठरवलेले असावे.' एकजण म्हणाला.

'या गावात बाहेरगावचे पुष्कळ रंगेल तरुण येतात. दिसतात गुलजार. गेली असेल पळून. दिला असेल कोणी विडा!' आणखी कोणी म्हणाला.

'आणि आज बुधवारी जायची गरज तरी काय होती? मंगळवार शुक्रवारी गर्दी असते. तिला गर्दी नको होती. एकान्त हवा होता.' तिसरा बडबडला.

'मी तिला चांगली सांगत होत्ये की शुक्रवारी जाऊ. तर म्हणे कशी की, गर्दीत प्रार्थना मनापासून नाही करता येत. बुधवारीच जाऊ. अगदी एकटी जाणार होती. म्हणे कशी, कोणी नको बरोबर; परंतु मी म्हटले की, कोणी नको तर नको; परंतु मी येईन बरोबर. तिने कोणाजवळ तरी ठरवले असावे.' चारूची आई म्हणाली.

'हा शिक्षणाचा परिणाम.' एक सद्गृहस्थ उद्गारले.

'आता चारूला कळवा.' कोणी सुचवले.

'काय, कळवा काय?' एकाने विचारले.

'कळवा, चित्रा कोणाचा हात धरून गेली. जाऊ दे, दुःखी होऊ नकोस. येथे दुसरी मुलगी तयार आहे, तुझ्या आईच्या मैत्रिणीची. तुझ्यासाठी जणू. तिचे अद्याप कोठे जमलेले नाही. देऊ बार उडवून, असे लिहा.' एका शिष्टांनी तपकीर नाकात कोंबीत सांगितले.

* * *

चित्रा नि चारू : प्रकरण सहावे

चित्राचा शोध

चारूची आई दुसऱ्याच दिवशी एकदम घरी गोडगावला जायला निघाली. माहेरी चित्राचा काटा काढायलाच ती गेली होती. ते काम झाले. इकडे चारूला कळवणे जरूर होते. त्याने डोक्यात राख घालू नये म्हणून त्याची समजूत घालणे आवश्यक होते.

एके दिवशी अकस्मात चारूची आई घरी आली; परंतु बरोबर चित्रा नव्हती. 'आई, तू एकटीशी आलीस ? चित्रा कोठे आहे ? तिचे दोन दिवसांपूर्वीच पत्र आले की 'न्यायला या' आणि आज तू एकटी कशी आलीस ? चित्रा कोठे आहे ? बरी आहे ना माझी चित्रा ? खुशाल आहे ना ? आई, सांग लवकर. मला धीर नाही निघत.'

'बाळ, चित्रा गेली.'

'काय ? चित्रा गेली ? काय झाले तिला ? आई, एकदम कशी गेली ? अरेरे !'

'रडू नकोस. चित्रा गेली म्हणजे जगातून नाही गेली. ती मेली नाही. मरती तरी बरी; परंतु तोंडाला काळे फासून गेली. कोणा रंगेलाचा हात धरून गेली. कोणी तरी तिला दिली पट्टी. गेली त्याच्याबरोबर. मला पहिल्यापासूनच असे वाटत होते. मुसलमानांशी हिची मैत्री आणि मुलगीही निर्लज्ज. पहिल्या भेटीतच मळ्यात लागली तुझ्याबरोबर हसायला, बोलायला. तू तेव्हाच पारख केली पाहिजे होतीस. आम्ही बायका शितावरून भाताची परीक्षा करतो. तू ऐकले नाहीस. आता भोगा फळे.'

'आई, काय तू बोलतेस ?'

'खरे ते बोलते. मला खोटे सांगून काय करायचे आहे? तुझा आनंद तो माझा. आमचा एकुलता एक मुलगा तू. तुझे वाईट व्हावे असे का तुझ्या आईला वाटेल? मी इतकी का नीच असेन? चित्राविषयीचा तिटकारा मी जिंकला. तुला ती आवडते म्हणून शेवटी तिच्यावर मी प्रेम करू लागल्ये. तिला माझ्या माहेरी नेले; परंतु तेथे तिने हा चावटपणा केला. कशी मी तेथे राहू? कसे त्या गावात तोंड बाहेर काढू? चारू, मला देवाचेच काही हेतू दिसतात. चित्राजवळ लग्न होऊन इतके दिवस झाले. तुला मूलबाळही झाले नाही. तीही बाहेर पडली. तिच्याशी तुझा नकोच संबंध, तिच्या द्वारा नको आपला वंशतंतू राहायला, असे देवाच्या मनात असावे. मी सांगू का, ती माझ्या मैत्रिणीची मुलगी अद्याप लग्नाची आहे. जणू तुझ्यासाठीच देवाने तिला अद्याप अविवाहित ठेवले आहे. काही तरी अडचण येते व तिचे लग्न मोडते. तुझीच ती आहे. लहानपणापासून तुझ्या आईने जे योजले तीच जणू देवाचीही योजना होती. तू माझे ऐक. जाऊ दे ती चित्रा चुलीत. तिच्या बापाला एक पत्र टाक. मोकळा हो. दुसरे लग्न कर. माझ्या मांडीवर नातवंड दे हो चारू.'

'आई, मला जगावेसे वाटत नाही. चित्रा माझ्या जीवनाचा आधार होती. किती तिचे माझ्यावर प्रेम! काही तरी घोटाळा आहे. आई, मनात येते की, तुझे व त्या तुझ्या मैत्रिणीचे हे कारस्थान आहे. त्या मुलीची घोरपड माझ्या गळ्यात बांधण्यासाठी तुमचे हे उद्योग आहेत. चित्राला तिकडे नेता यावे म्हणून तू एकदम खोटे वरपांगी प्रेम तिच्यावर करू लागलीस. त्या कोणा पुत्रदादेवीची कथा रचलीस. तिला नवस केला म्हणजे मुलगा होतो, असे त्या भोळ्याभाबड्या मुलीच्या मनात भरवलेस. आई, सारे तुझे कारस्थान. तू माझी जन्मदाती; परंतु माझ्या मनात असे येते खरे. मी जातो, चित्राचा शोध करायला जातो. तिच्या आईबापांस मी काय सांगू? अरेरे, चित्रा, कोठे आहेस तू? आई, तिला मारलीत तर नाही? विहिरीत तर नाही ना लोटलेत? विष नाही ना दिलेत? खड्ड्यात नाही ना लोटलेत? कड्यावरून नाही ना लोटलेत? आई, माझी चित्रा दे. तू माझी चित्रा चोरली आहेस. चित्रा दे, नाही तर तुझा मुलगा मेला असे समज. नको हे घर, ही जहागीर. दे, चित्रा नाही म्हणजे काही नाही. अकपट प्रेमळ मुलगी. म्हणे एकदम कशी तुझ्याजवळ बोलली! आई, आमची जणू शतजन्मांची ओळख होती असे वाटले. माझ्या प्राणांना

तीच जणू दुरून पोषीत होती आणि शेवटी मला शोधीत त्या मळ्यात आली. हृदयाची भाषा तुला काय कळे! आई, चित्राविषयी खोट्या कंड्या नको उठवू. शपथ आहे तुला. मी चालता होतो. चित्रा सापडली तर घरी परत येईन, नाही तर जीव देईन. प्राण नाही देववला तर कोठे हिमालयात निघून जाईन. हा माझा शेवटचा प्रणाम. बाबांना सांग. तेही बाहेरगावी गेले आहेत. त्यांना सांग की चारू गेला. चित्राला शोधायला गेला. माझी चित्रा मला सापडेल. तरीच बुधवारी मला सारखे रडू येत होते आणि चित्रानेही पत्रात तसेच लिहिले आहे. आमची दोघांची हृदये एक आहेत, याचा हा घे पुरावा. एकाच दिवशी आमच्या दोघांच्या हृदयांस हुरहूर लागली होती. अशी माझी चित्रा, ती का कोणाचा हात धरून जाईल? आई, केवढे कुभांड तू रचीत आहेस? निष्पाप व निर्मल मुलीला तू कलंक लावू पाहात आहेस. आई, हे पाप, घोर पाप आहे. कोठे हे फेडशील? अरेरे! चित्रा, कोठे असशील तू? टाहो फोडीत असशील, रडत असशील. कोठे तुला पाहू, कोणाला विचारू, कोठे शोधू? आई, प्रणाम. चालला हो चारू.' आणि चारू खरेच घर सोडून निघून गेला. त्याने चित्राच्या वडिलांना पुढीलप्रमाणे पत्र लिहिले –

सेवेशी कृ. स. प्रणाम.

चारू आज घर सोडून बाहेर पडत आहे. चित्रा कोठे तरी हरवली आहे. आईबरोबर ती आमच्या आजोळी गेली होती; परंतु एके दिवशी अकस्मात् ती हरवली. काय घोटाळा आहे समजत नाही. आई घरी आली ताबडतोब. मी चित्राच्या शोधार्थ बाहेर पडत आहे. चित्रा सापडली तरच घरी परत येईन. चित्रा सापडली तरच तुम्हालाही तोंड दाखवीन. मी दुःखी आहे. चित्रा म्हणजे माझे पंचप्राण. तिच्याशिवाय मी जगू शकणार नाही. देवाची इच्छा असेल तसे होईल.

तुमचा अभागी

चारू

असे पत्र लिहून चारू चित्राच्या शोधार्थ जणू फकीर होऊन बाहेर पडला आणि ते पत्र चित्राच्या वडिलांना मिळाले. त्यांना धक्काच बसला. चित्राशी आपले भाग्य निगडित आहे असे त्यांना नेहमी वाटत असे. चित्रा जन्मली आणि ते एकदम मामलेदार झाले. चित्रा वाचली आणि पुढची मुले वाचू लागली.

'होय साहेब.'

गाडी सुटली व भोजू घरी आला. बळवंतराव गोडगावला गेले. अद्याप जहागीरदार घरी आले नव्हते. चारू घर सोडून गेलाच होता.

'काय हो, काय आहे हकीगत माझ्या मुलीची ? सारे सांगा तरी एकदा.' बळवंतराव दुःखाने म्हणाले.

'माझ्या तोंडाने सांगवत नाही. पहिल्यापासून माझे मत होते की, तुमची मुलगी नको म्हणून; परंतु या सर्वांचा हट्ट. मीसुद्धा शेवटी तिच्यावर प्रेम करू लागल्ये. तिला माझ्याबरोबर नेली. म्हटले, देवीला नवस करू. पुत्र होईल, परंतु तिथे कोणाबरोबर पळून गेली. तोंडाला काळोखी फासून गेली. आमची मान खाली. सारे लोक टिंगल करीत आहेत. हा चारूही कोठे गेला. तुमच्या मुलीने सारा सत्यानाश केला आमचा. अब्रू गेली. मुलगाही कोठे गेला, पत्ता नाही. एकुलता आमचा मुलगा.' असे म्हणून ती दुष्ट सासू खोटे खोटे रडू लागली.

'तुम्ही काही म्हणा. चित्रा असे करणार नाही. कोणी तरी तिला पळवले असेल. असतात अशा टोळ्या. माझी चित्रा देवता आहे. तारणारी देवता. ती सत्यानाश करणारी नसून सर्वांचे मंगल करणारी आहे. ती जन्माला आली व मी मामलेदार झालो. तिच्या पूर्वी झालेली सारी मुले मेली; परंतु ती जगली आणि तिच्या पाठीवरचीही जगली. आमच्या घरात संतती, संपत्ती, आनंद तिच्यामुळे आला. ती प्रेमळ व निर्मळ आहे. भोळी आहे. तिला कोणाची शंका येत नाही. सर्वांवर प्रेम करील. सर्वांना जवळचे देईल. सापडेल. कोठे तरी सापडेल माझी चित्रा.'

असे म्हणून बळवंतराव बाहेर बैठकीच्या जागी गेले. जेवण करून गोडगाव सोडून तेही चित्राच्या शोधार्थ सर्वत्र हिंडू लागले. सापडेल का चित्रा ?

❋ ❋ ❋

चित्रा नि चारू : प्रकरण सातवे

चित्रेच्या वडिलांना वेड लागते

बळवंतरावांनी सर्वत्र शोध केला, परंतु चित्राचा पत्ता नाही. त्यांची रजाही संपली. अधिक रजा मिळणे शक्य नव्हते. ते परत आले. कामावर रुजू झाले; परंतु त्यांचे कशात लक्ष लागेना. कामातही लक्ष लागेना.

बळवंतरावांना एकदम मामलेदारी मिळाली होती. त्याचे काहींना वैषम्य वाटत होते. बळवंतरावांचा मत्सर करणारे लोक होते. खुद्द त्यांच्याच कचेरीत असे लोक होते. बळवंतराव अलिकडे कामाविषयी जरा बेफिकीर होते. ते काही गावांना न जाताच त्या गावी जाऊन आलो म्हणून कामाच्या डायरीत लिहीत. त्यांच्या आता लक्षातही फारसे राहात नसे. त्यांचा मेंदू काम देईनासा झाला.

या संधीचा दुष्टांनी फायदा घेतला. कलेक्टरकडे निनावी पत्रे गेली. मामलेदारसाहेब न हिंडताफिरताच डायरी वगैरे भरतात असे कळवले गेले. कलेक्टर जरा कडवा होता. तो अकस्मात एके दिवशी येऊन दाखल झाला. चौकशी करू लागला. कामाची डायरी पाहू लागला.

'या गावांना गेले होतेत का तुम्ही? नोंद तर आहे. गेले होतेत का?' कलेक्टरने विचारले.

'मला आठवत नाही.'

'सरकारी काम म्हणजे का हजामती? आठवत काय नाही? बिनआठवणीचा अधिकारी काय कामाचा? येथे गावांची नावे भराभरा लिहायला बरी आठवली!'

'गेलो असेन मी.' बळवंतराव म्हणाले.

'शिपाई, त्या गावांचे पाटील बाहेर आले आहेत, त्या सर्वांना बोलवा आत.' साहेबांचा हुकूम झाला.

ते पाटील आत येऊन उभे राहिले.

'हे तुमच्या गावांना गेल्या आठपंधरा दिवसांत आले होते का?'

'नाही आले. आम्ही बोलावले होते. लोक आणेवारीची तक्रार करीत आहेत.'

'काय हो, हे पाटील काय म्हणतात?'

'मला काही कळत नाही.'

'ठीक. तुम्हाला कळेल असे करतो हां. जा.'

बळवंतराव खरेच निघून गेले. ते बाहेर जाऊन बसले. थोड्या वेळाने घरीच निघून गेले. कलेक्टरने कडक रिपोर्ट वर केला. बळवंतरावांना नालायक ठरवण्यात आले; परंतु सरकारने, त्यांनी सक्तीची काही महिने रजा घ्यावी असे सांगितले. जर पुढे कार्यक्षम दिसले तर पुन्हा कामावर घेण्यात येईल असे कळविले.

बळवंतरावांना हा मोठाच धक्का होता. सार्वजनिक जीवनाच्या दृष्टीने ही बेअब्रू होती. तिकडे मुलीचा पत्ता नाही. इकडे नोकरीवरून बडतर्फ. पुन्हा कामाला नालायक हा शिक्का! सरकारदरबारी बेअब्रू. बळवंतराव खोलीत सचिंत होऊन बसले. काय करावे ते त्यांना सुचेना.

'भोजू,' त्यांनी हाक मारली.

'काय साहेब?'

'चित्रा आली का?'

'नाही साहेब. कोठून येणार?'

'तू म्हणाला होतास ना की येईल म्हणून?'

'अजूनसुद्धा म्हणतो. धनी, घोर नका करू. सारे चांगले होईल. देव सत्त्व पाहातो आहे.'

'भोजू, चित्रा सापडली तरच आता बरे दिवस येतील. माझे भाग्य चित्राशी जणू जोडलेले आहे. ती जन्मली व आम्हाला ऊर्जितकाळ आला. मुले वाचू लागली. कोठे आहे चित्रा? कधी भेटेल? आज नोकरी गेली. बेकार झालो. उद्या काय होणार? कोठे आता थांबणार संकटांची ही गाडी? येऊ लागली की लागोपाठ येतात. नोकरीत आजपर्यंत कोणी नाव नाही ठेवले मला! परंतु

आज मी नालायक ठरलो. लक्षच लागत नाही. आठवणच राहात नाही. सुचत नाही. काय करू मी? भोजू, मला वेड लागेल असे वाटते! सारखी चित्रा डोळ्यांसमोर येते.'

'धनी, सारे चांगले होईल. धीर नका सोडू.'

'मला वेड लागले, तर भोजू, तू या सर्वांची काळजी घे हो.'

'परंतु वेड लागणार नाही धनी.'

'परंतु मला कबूल कर. तू नाही ना सोडून जाणार? सध्या आम्हाला साडेसाती आली आहे. तू नको हो सोडून जाऊ. भोजू, आमच्याजवळ पैसेही फार नाहीत. मी लाचलुचपत घेतली नाही. जो कोणी मदत मागेल त्याला नाही म्हटले नाही. कितीतरी शेतकऱ्यांना मी पैसे दिले. त्यांच्या लग्नाला दिले. अरे त्यांचेच पैसे. मी उपकार केले असे नाही मी म्हणत. हिला एक चार दागिने केले तेवढेच. उद्या मी वेडा झालो तर कसे व्हायचे? मुलांचे शिक्षण कसे व्हायचे? भोजू, तू यांना सोडू नको हो. कबूल कर.'

'नाही हो सोडणार. काही कमी पडू देणार नाही. माझे तिकडे माझ्या मुलुखात घरदार आहे. थोडी शेती आहे. वेळ आली तर ते मी विकीन, परंतु सांभाळीन सर्वांना. तुम्ही काळजी करू नका. परंतु सारे चांगलेच होईल. काळजी नका करू. चित्राताई भेटतील. त्यांचे यजमान भेटतील.'

घरात आता आनंद नव्हता. सारी सचिंत होती. सीताबाई रडत बसत. बळवंतराव भ्रमिष्टासारखे करीत. श्यामू, रामू, दामू आईजवळ बसत. त्या मुलांना रडू येई.

'आई, बाबा कधी होतील बरे?' श्यामू विचारी.

'चित्राताई आली तर बरे होतील.' ती सांगे.

'आम्ही जाऊ शोधायला?' ती मुले विचारीत.

'तुम्ही लहान आहात रे.' ती म्हणे.

'सीतेला शोधायला वानरसुद्धा गेले. आम्ही तर माणसे.' श्यामू म्हणे.

'अरे ते वानर नव्हते. ते देव होते. मारुती म्हणजे का साधे माकड? तुम्ही शाळेत जात जा. परीक्षेत पास व्हा हो बाळांनो. जातील हे दिवस. उगी. रडू नका. आणि बाहेर कोणी काही विचारले तर फार बोलत नका जाऊ. समजले ना?' सीताबाई सांगायच्या.

काही दिवस असे गेले. बळवंतराव आता पूर्ण भ्रमिष्ट झाले. ते एकदम काहीतरी बोलत. जेवायसाठी पाटावर बसत आणि 'चित्रा, आलो हो. कोण नेतो तुला पळवून, बघू दे.' असे म्हणून एकदम उठून धावत. काठी घेत. घरातून बाहेर जात. भोजू त्यांना परत घरात आणी.

ते आपल्या खोलीत बसून राहात. भोजू पहारा करी. बळवंतरावांना कधी तो कलेक्टर डोळ्यांसमोर दिसे. ते आपल्या मुठी वळीत. 'मोठा आला कलेक्टर! थोबाडला असता त्या दिवशी. त्याची मुलगी हरवली असती तर त्याचे नसते का डोके फिरले? आणा रे त्या कलेक्टरला धरून. कानशिलात देतो त्या गाढवाच्या. हा बळवंतराव का नालायक? मग लायक तरी कोण? चित्रा. जगात फक्त चित्रा लायक. कोठे आहे चित्रा? हाका मारते वाटते? भोजू, धाव. चित्राच्या मदतीला धाव. दुष्ट आहे तिची सासू. दुष्ट, फार दुष्ट राक्षसीण आहे. तिनेच चित्राला नाहीसे केले. नाही नाही ते बोलते. बोलू दे.'



'...ती बघा चित्रा! श्यामू, रामू, दामू आली रे तुमची ताई! हसा. पुसा डोळ्याचे पाणी. चित्रा, कोठे ग लपली होतीस? दाराआड होतीस? कोठे होतीस? आता मी वेडा नाही. कोण म्हणते मी वेडा आहे? मी वेडा, तर शहाणा कोण? चित्रा, चित्रा एक शहाणी. साऱ्या जगाला ती अक्कल देईल. निष्पाप मन म्हणजेच नाही का अक्कल! सर्वांवर विश्वास म्हणजेच नव्हे का परम ज्ञान? हसता काय? मूर्ख आहात सारी! चित्राला ज्ञान आहे ते तुम्हाला शंभर जन्म तपश्चर्या करूनही मिळणार नाही.'

'...भोजू, भोजू रे! कोठे आहे भोजू? तू हो सर्वांना. मी वेडा! तू सांभाळ. तू आपले घरदार विकणार? आमच्यासाठी? तू साधा गडी, न शिकलेला आणि असे थोर तुझे मन! चित्रासारखाच तूही ज्ञानी आहेस.'

'...त्या कलेक्टरला जा शिकव. दे दोन थोबाडीत त्या लेकाच्या. कलेक्टरची खुर्ची मिळाली म्हणजे का अक्कल येते? सहानुभूतीने ज्ञान मिळते. नम्रपणाने ज्ञान मिळते.'

अशी बळवंतरावांची बडबड अखंड चालू असायची. कधीकधी मुके बसले की अखंड मौन. एक शब्द मग बोलत नसत.

'आई, माझ्या मनात येते ते सांगू?' भोजूने सीताबाईंस विचारले.

'काय भोजू?'

'आपण यांना इस्पितळात ठेवले तर? तेथे वेड जाते. काही उपाय करतात. आपण येथून सारीच जाऊ. तिकडेच राहू. ठाण्याला म्हणतात, आहे असा दवाखाना. मी येऊ का चौकशी करून?'

'भोजू, तू सांगशील तसे. तुझ्यावर त्यांचा लोभ होता. नाथांकडे श्रीखंड्या तसा जणू तू आमच्याकडे आलास. तुझाच आता आधार आहे हो. माहेरी तरी माझे सख्खे कोण आहे? एकदा येऊन गेले. पुन्हा कोणी आले का? जाऊ दे. आपले नशीब नि आपण; परंतु त्या इस्पितळात खर्च द्यावा लागेल. मुलांच्या विद्या! कसे करायचे! ह्या पाटल्या विकाव्या. ही कुडी विकावी.'

'आई, तुम्ही काळजी नका करू. एवढ्यात अंगावरचे विकू नका. शेवटी आलीच वेळ तर विकू. मी ठाण्यास चौकशी करून येतो. येतो जाऊन.'

'ये.'

आणि भोजू गेला. ठाण्यास येऊन त्याने सर्व चौकशी केली. त्याने बळवंतरावांसंबंधी सारी हकीगत सांगितली. डॉक्टर म्हणाले, 'घेऊन या. गुण येईल.' भोजूने तेथे राहायला एक चांगले घरही पाहिले. नौपाड्याच्या दत्तमंदिरात खोल्या रिकाम्या होत्या. तेथून इस्पितळही जवळ होते. सीताबाईंना देवळाचाही आधार होईल. ते दत्तमंदिर सुंदर होते. केवढे थोरले आवार. बाग होती. तेथे मोफत वाचनालय होते. मोफत दवाखाना होता. रम्य शांत ठिकाण. मुलांना शाळाही फार लांब नव्हती. तेथे सारी व्यवस्था करून भोजू आपल्या गावी गेला. त्याने आपले घरदार, शेतीवाडी विकली आणि जे काय हजारभर रुपये मिळाले ते तो घेऊन आला. आपल्या नावाने पोस्टात त्याने ते ठेवले.

भोजू घरी आला. त्याने सीताबाईंस सारे सांगितले. त्या दत्तमंदिराचे त्याने रम्य वर्णन केले. सायंकाळी सुंदर आरती होते. नगारा वाजतो. टाळ, तास वाजतात. पुजारी भक्तिभावाने गोड गाणी म्हणतो. ते इस्पितळही जवळच. वेड्यांचे डॉक्टर फार सज्जन आहेत. सारे सारे त्याने सांगितले.

सीताबाईंनी जायचे ठरवले.

'येता ना ठाण्यास?' भोजूने बळवंतरावांस विचारले.

'ठाण्यास?'

'हो.'

'तेथे कशाला? तेथे तुरुंग आहे. वेड्यांचे इस्पितळ आहे. मला का कलेक्टर तुरुंगात घालीत आहे! का वेड्यांच्या इस्पितळात पाठवीत आहे?'

'तेथे चित्रा आहे. तेथे चित्राताई भेटेल.'

'खरेच का? तपास लागला तिचा?'

'असे कळले आहे.'

'चला तर मग. करा तयारी. वाऱ्यावर बसून जाऊ.'

'आगगाडीने जाऊ.'

'खरेच! श्यामू, रामू, दामू वाऱ्यावरून पडतील. तीसुद्धा येणार ना? येईलच. ती येथे एकटी थोडीच राहाणार? चला, लवकर चला म्हणजे झाले.'

सर्व मंडळी ठाण्याला आली. त्या दत्तमंदिराच्या आवारात आली. तेथील मोफत दवाखान्याचे डॉक्टर भले गृहस्थ होते. त्यांची व वेड्यांच्या दवाखान्यातील

डॉक्टरांची ओळख होती. त्यांनी बळवंतरावांस मोटारीतून तिकडे नेले. बरोबर भोजू व सीताबाई होत्या.

बळवंतरावांना दवाखान्यात ठेवण्यात आले. सीताबाई व भोजू परत घरी आली. हळुहळू सारी व्यवस्था लागली. सीताबाई दत्तासमोर सारख्या बसत व प्रार्थना करीत. भोजू सर्वांना धीर देत होता.

'बरे होईल का हो वेड ?' सीताबाई आशेने मंदिरातील डॉक्टरांना विचारीत.

'होईल हो बरे. तुमची चित्रा सापडली, तर एका क्षणात वेड जाईल.' ते म्हणाले.

'कोठे गेली चित्रा ?' सीताबाई रडू लागल्या.

'सापडतील. दत्तराजाची कृपा होईल.' डॉक्टरांनी धीर दिला.

'तुमच्यासारखी चांगली माणसे भेटली ही देवाचीच दया. हा भोजूच पाहा. देवानेच जणू तो आम्हाला दिला. देव दयाळू आहे. तो आणखी थोडी दया नाही का दाखवणार ? दाखवील. दत्तगुरू सारे चांगले करतील.' असे सीताबाई आशेने परंतु स्फुंदत म्हणाल्या.

❋ ❋ ❋

चित्रा नि चारू : प्रकरण आठवे

चित्राची कहाणी

त्या गुंडांनी चित्राला पळवून नेले. एका मोठ्या शहरात ते आले. जो गुंडांचा नायक होता, त्याच्या ताब्यात आता चित्रा होती. एका मोठ्या इमारतीत ती होती. एका खोलीत होती. खोलीला बाहेरून कुलूप होते. तो गुंड दिवसातून दोनचारदा येई.

'का मला छळता? गरीब गाईला छळू नका. सोडा मला.' ती म्हणे.

'बाई, पोटासाठी आम्ही सारे करतो. मी तुमच्या अंगाला हात लावणार नाही; परंतु तुम्हाला आम्ही विकू. त्या पैशांनी आमच्या कुटुंबाचे पोषण करू. तुमचा येथे छळ नाही. खा, प्या.'

'कसे खाऊ? येथे कशी राहू?'

'ते तुमचे तुम्ही पाहा. येथे खायला मिळत नसेल तर सांगा. फळे पाहिजेत? तुमची भरपूर किंमत आली पाहिजे. आमच्यासाठी तरी शरीराची काळजी घ्या. अशक्त झाल्यात तर कोण विकत घेईल?'

'तुम्ही का कसाब आहात?'

'आम्ही पोटाची विवंचना करणारी माणसे आहोत. पोट आम्हाला कसाब व्हायला शिकवते, दरोडेखोर व्हायला शिकवते. खुनी व्हायला शिकवते. जातो मी. चांगल्या गिऱ्हाइकालाच तुम्हाला विकीन. मलाही तुमची दया येते; परंतु माझ्या पोराबाळांची अधिक येते.' असे म्हणून तो गेला.

आणि एके दिवशी एक गिऱ्हाईक आले.

'तुम्ही किती द्याल पैसे?' गुंडाने विचारले.

'परंतु माल तर पाहू द्या.' ते गिऱ्हाईक म्हणाले.

'माल खूबसुरत आहे. बहोत उमदा माल!'

'खरे सांगायचे, म्हणजे माल मलाही नको आहे. मी आणखी कोणाला विकीन. तू किती घेणार पैसे?'

'दोन हजार तरी द्या!'

'परंतु एकदा पाहू दे ती मुलगी.'

'मुलगी म्हणजे रत्न आहे. मला तिची दया येते. खरोखरच गोड आहे ती मुलगी.'

तो गुंड व ते गिऱ्हाईक चित्राच्या खोलीत आले. चित्रा घाबरली.

'सोडा हो मला. तुम्ही का मला त्यांना विकणार?'

'हो.'

'अरेरे. मी का बाजारी माल?'

'पोटासाठी. सारे पोटासाठी!'

'हे तर श्रीमंत दिसतात. हेही का पोटासाठी मला विकत घेणार?'

'माझ्या चैनीसाठी तुला विकत घेणार आहे.' ते गिऱ्हाईक म्हणाले.

'तुम्ही मुसलमान दिसता. खरोखरच का मुसलमान वाईट असतात?'

'आम्हाला बोलायला वेळ नाही.'

ते दोघे गेले. सौदा ठरला. रात्रीच्या वेळेस एक मोटार आली. चित्राच्या तोंडात बोळा कोंबण्यात आला. तिच्या तोंडावर बुरखा घालण्यात आला. तिला खाली नेण्यात आले. मोटारीत घालण्यात आले. गेली मोटार.

कोठे गेली चित्रा? पुढे काय झाले तिचे?

त्या मुसलमानाचे खरे नाव होते दिलावर; परंतु त्याने खोटे नाव घेतले होते. आपण त्याला दिलावर म्हणूनच ओळखू. कोण हा दिलावर?

हा दिलावर फातमाचा नवरा. दिलावर उधळ्या होता. त्याला नेहमी पैशांची टंचाई असे. फातमा त्याला बोले; परंतु त्याचा खर्च कमी होत नसे. त्याला डझनावारी कपडे लागत. आज ही टोपी घाली, उद्या दुसरी. आज गोंड्याची तर उद्या फेझ. आज हा सूट, उद्या तो. अत्तरांचा घमघमाट असायचा. मित्रांना हॉटेलांतून खाने द्यायचा. उदार म्हणून मिरवायचा.

पैसे पुरे पडत ना, तेव्हा दिलावर हा बायकांचा धंदा करू लागला. पळवून आणलेल्या बायका तो विकत घेई व पुन्हा आणखी कोणाला नफ्याने विकी. बरा चालला होता धंदा.

फातमाला या गोष्टी फारशा माहीत नव्हत्या. तिचे दिलावरवर प्रेम होते. दिलावर तसा स्वभावाने दुष्ट नव्हता; परंतु चैनीची चटक त्याला लागली होती आणि पैशांसाठी तो हे प्रकार करू लागला.

त्याने एका खोलीत चित्राला ठेवले होते. चित्राच्या सेवेला त्याने एक मोलकरीण ठेवली होती. तिची तो काळजी घेई. रोज तिच्याकडे जाई.

'सोडा मला. मी पाया पडते. माझा पती वाट पाहात असेल. आईबाप रडत असतील. दु:खाने वेडे होतील. दया करा. तुमचे नाव रहीम ना? रहीम म्हणजे दया करणारा ना? रहीम हे नाव लहानपणापासून मला आवडे.'

'तुम्हाला का मुसलमानी नावे आवडतात?'

'चांगली नावे कोणाला आवडणार नाहीत? आणि माझी मुसलमान मैत्रीण होती. मी तिच्याकडे जात असे. किती माझ्यावर तिचे प्रेम. माझ्याजवळून तिने रामायण नेले होते. तिने मला 'इस्लामी संत' हे पुस्तक दिले होते. मुसलमान वाईट आहेत असे कोणी म्हटले, तर मी ते चांगले आहेत असे म्हणे आणि फातमा, तिचे आजोबा महंमदसाहेब यांचे उदाहरण मी देत असे; परंतु आज निराळाच अनुभव येत आहे. मुसलमानांचे नाव बद्दू नका करू. उज्ज्वल करा. मला बहीण माना व सोडा.'

'तुमच्या मैत्रिणीचे नाव काय फातमा?'

'हो.'

'ती तुम्हाला पत्र पाठवी?'

'एकदोनदा आले. तिच्या नवऱ्याचे नाव दिलावर. तोही स्वभावाने उदार व प्रेमळ आहे असे तिने लिहिले होते; परंतु पुढे बरेच दिवसांत तिचे पत्र नाही. तुम्ही ओळखता माझी फातमा?'

'जगात लाखो फातमा आहेत.'

'परंतु माझ्या फातमासारखी प्रेमळ कोण असेल?'

रहीम म्हणजेच दिलावर निघून गेला. कुलूप लावून निघून गेला. तो घरी आला. फातमा काही विणीत बसली होती.

'दिलावर!'

'काय फातमा?'

'सोड हो तुझे फंद. तू मला रडवतोस. तुझ्यासाठी मी प्रार्थना करीत असते.'

'परंतु मी काय केले वाईट?'

'ही चैन सोड. चैनीसाठी तुला पैसा पुरा पडत नाही. तू पैशासाठी खोटेनाटे करू लागशील. इज्जत घालवून बसशील. माझे ऐक. माझे स्त्रीधनही तुला दिले. तुझ्यासाठी मी भिकारी झाल्ये.'

'तुला आता मी श्रीमंत करीन. पाच हजार रुपये तुला मी आणून देईन. तुझे पाच हजार मी खर्च केले, होय ना?'

'दिलावर, माझे म्हणजे तुझेच हो. माझे द्यायला नकोत परत; परंतु चैन कमी कर. आपण गरिबीने राहू, परंतु अब्रूने राहू. कोठून रे आणणार आहेस पाच हजार? जुगार खेळून? दरोडा घालून?'

'मिळणार आहेत! बघ एक दिवस. तुझ्यासमोर आणून रास ओतीन. हे काय करते आहेस?'

'माझ्यावर प्रेम करणाऱ्याला स्वेटर.'

'कोण करते तुझ्यावर प्रेम?'

'तूच सांग.'

'मी. होय ना? तुला हे कोणी शिकवले करायला?'

'माझ्या एका मैत्रिणीने.'

'काय तिचे नाव?'

'तिचे नाव चित्रा. तिनेच ते रामायण मला दिले. प्रेमाची भेट. मला रामायण आवडते. एकपत्नी, एकवचनी राम आणि सीतादेवी तर केवळ सत्त्वमूर्ती!'

'कोठे आहे तुझी चित्रा?'

'माझ्या हृदयात आहे.'

'तू पत्र नाही पाठवीत तिला?'

'आमचे बायकांचे नाही हो शेवटी जमत. नवऱ्यांच्या संसारात आम्ही एकरूप होतो.'

'फातमा, आज पट्टी नाही दिलीस.'

'माझ्या चित्राला मी पट्टी करून देत असे. तिला माझ्या हातची आवडे. तिचे तोंड रंगे. माझे तोंड रंगत नसे तेव्हा.'

'आता रंगते ना?'

'दिलावरने मला विडा दिला म्हणजे रंगतो. ही घे पट्टी. दिलावर मला एक वचन दे आज.'

'काय वचन देऊ?'

'नकोच पण वचन. तू चांगलाच वागशील.'

दिलावर बाहेर निघून गेला.

इकडे एके दिवशी चित्रा रडत होती, तो ती मोलकरीण आली.

'काय ग तुझे नाव?'

'माझे नाव अमीना.'

'अमीना, तू स्त्री, मी स्त्री. स्त्रीची स्त्रीने नाही बाजू घ्यायची तर कोण घेईल? तू मला येथून सोडव. मी तुझे उपकार फेडीन, तुझे दारिद्र्य फेडीन. माझ्यावर विश्वास ठेव. अमीना, माझा पती माझ्यासाठी तडफडत असेल. पाखरेसुद्धा नर-मादी जर अलग झाली तर तडफडून प्राण देतात. आपण तर माणसे. अमीना, वाचवशील मला?'

'मी एक करू शकेन.'

'काय?'

'धन्याची बायको म्हणजे देवमाणूस आहे. तिच्या कानांवर मी तुमची हकीगत घालीन. तिला तुमची दया येईल.'

'जा, त्या माउलीला सांग. मी तुझे उपकार विसरणार नाही.'

अमीना फातमाकडे आली.

'अमीना, अलिकडे तू फारशी बाहेर जातेस? आणखी कोणाकडे फावल्या वेळात काम करतेस वाटते?'

'फातमाबिबी, तुमच्या पायाशी एक अर्जी आहे.'

'काय आहे? पैसे हवे असतील. कोणी आजारी का आहे? मुले बरी आहेत ना?'

'सारी खुशाल. गुप्त गोष्ट आहे. दिलावरसाहेबांनी एक वाईट गोष्ट केली आहे.'

'कोणती ?'

'त्यांनी कोणी एक हिंदू मुलगी पळवून आणली आहे. ती सारखी रडत असते. तुम्ही तिचे संकट दूर करू शकाल. फार गोड व गरीब मुलगी आहे, मला वाईट वाटते; परंतु मी काय करणार ? म्हटलं, तुमच्या कानांवर घालीन.'

'किती दिवस झाले ?'

'बरेच दिवस झाले.'

'काही वेडेवाकडे झाले का ?'

'दिलावर तसे पाक आदमी आहेत; परंतु ते या मुलीला कोणाला तरी विकणार आहेत, त्यांची तिच्यावर पापदृष्टी नाही.'

'पैशासाठी सारे ! दिलावर, काय चालवलेस हे ! बरे, अमीना, आता येऊ का मी तुझ्याबरोबर ? दिलावर तेथे केव्हा येतो ?'

'आता आज येणार नाहीत.'



'तर मग मी जरा अंधार पडला म्हणजे तुझ्याबरोबर येईन आणि हे बघ, आपल्या या घरात ती एक रिकामी खोली आहे ना? ती खोली झाडून तेथे खाट, गादी ठेव. समजले? काही बोलायचे नाही हं.'

'नाही.'

सायंकाळ झाली. अमीना व फातमा दोघी निघाल्या. कुलूप उघडले. फातमा आत आली व अमीना बाहेरच उभी होती.

'कोण फातमा?'

'कोण चित्रा?'

'होय फातमा, माझी फातमा, मला वाचव, वाचव.'

'चित्रा, भिऊ नकोस. आता काळजी सोड.'

दोघी मैत्रिणी गळ्यात गळा घालून रडल्या. चित्राने सारी हकीगत सांगितली. सासूचे कारस्थान सांगितले. मधूनमधून तिला हुंदके येत. फातमाचे डोळेही भरून येत.

'फातमा, चारू तडफडत असेल. बाबा दुःखाने वेडे झाले असतील. लवकर मला मुक्त कर.'

'चित्रा, माझ्या बाबांना मी बोलावून घेते. ते आमदार आहेत. त्यांच्या अनेकांशी ओळखी आहेत. मोठ्यामोठ्यांशी. पुष्कळ हिंदू आमदारही त्यांच्या परिचयाचे आहेत. बाबांना बोलावते. ते दिलावरचे कान उपटतील. तू आता निश्चिंत राहा. आता चल माझ्याबरोबर माझ्या घरी. मोठे आहे घर. एका खोलीत बाबा येईपर्यंत तुला सुरक्षित ठेवीन. चल, बाबा तुला तुझ्या घरी घेऊन जातील हो. उगी, रडू नको. किती दिवसांनी भेटलो आणि किती चमत्कारिक परिस्थितीत. मला लाज वाटते. माझ्या नवऱ्याच्या हातून तू संकटात पडावीस!'

'परंतु वाचण्यासाठीच तुझ्या पतीच्या हाती आल्ये म्हणायची. दुसऱ्या कोणाच्या हातात पडल्ये असत्ये, तर फातमा, माझे काय झाले असते? देवाची दया की माझी विक्री होत होती. माझ्या शीलावर कोणी गदा आणली नाही.'

'चल, ऊठ. हा बुरखा घे.'

त्या तिघीजणी निघाल्या. फातमाचे घर आले. चित्रासाठी झाडून ठेवलेल्या खोलीत फातमा तिला घेऊन गेली.

'चित्रा, उद्या मी तुला न्हाऊ घालीन. तुझ्या केसांना सुगंधी तेल लावीन.'

'फातमा, चारू दृष्टीस पडेपर्यंत नकोत तेले, नकोत उटणी. त्याने जिवाचे बरेवाईट तर नसेल ना केले? मी जणू त्याची प्राण आहे.'

'चित्रा, भेटतील हो सारी. शांत राहा, मी बाहेरून कुलूप लावीन. दिलावर घरात नसला, म्हणजे मी तुझ्याजवळ येईन. आता रडू नकोस. तुझी ग्रहदशा संपली. आता सुखाचे दिवस येतील. खरेच, तुझ्या वडिलांचीही चौकशी करवते. बाबांना बोलावते. तारेनेच बोलावते. म्हणजे सारे ठीक होईल हो.' फातमाने धीर दिला.

❋ ❋ ❋

शेतकरी, विणकरी, रंगारी, पिंजारी, सोनार, सुतार, लोहार, कुंभार– सर्व

चित्रा नि चारू : प्रकरण नववे

आमदार हसन

फातमाच्या वडिलांचे नाव हसन. ते आमदार होते. स्वभावाने मोठे दिलदार व गोड. सर्वांशी त्यांचा परिचय. फातमा त्यांच्या पहिल्या बायकोची मुलगी. फातमा आजोळीच वाढली. हसन यांचा नवा दुसरा संसार भरभराटत होता. मुलेबाळे होती. मोठा पसारा होता.

फातमाने बापाला 'ताबडतोब या, महत्त्वाचे काम आहे,' अशी तार केली. हसनसाहेबांना तार मिळाली, त्यांचे उत्तर आले. 'येतो.' उत्तराची तार आली तेव्हा दिलावर घरी नव्हता. चित्रा पळून गेली, असे मोलकरणीने त्याला सांगितल्यापासून तो जरा पिसाळला होता. त्याला भीतीही वाटत होती. खटला वगैरे व्हायचा. ती मुलगी हुशार व सुशिक्षित होती. नेमकी पोलीस घेऊन यायची, असे त्याच्या मनात येई व तो घाबरे.

तो जरा त्रस्त व सचिंत असा घरी आला.

'दिलावर, बाबांची तार आली आहे.'

'तार ?'

'हो. ते येत आहेत उद्या सकाळच्या गाडीने. तू स्टेशनवर जा मोटार घेऊन.'

'का येत आहेत ?'

'कोणास ठाऊक ?'

'कोठे आहे तार ?'

'येथेच कोठे तरी होती. परंतु तारेत 'येतो' एवढेच होते.'

दुसऱ्या दिवशी सकाळी दिलावर मोटार घेऊन स्टेशनवर गेला. दुसरेही प्रतिष्ठित लोक त्याने बोलावले होते. हारतुरे होते. गाडी आली. आमदार हसन

आले. दिलावर सामोरा गेला. लोकांनी हार घातले. पोर्टरने सामान उचलले. बाहेर मोटार तयार होती. मोटार निघाली.

'दिलावर, काय काम आहे?' आमदार हसन यांनी विचारले.

'कसले काम?'

'फातमाच्या सहीची तार आली, 'काही महत्त्वाचे काम आहे. ताबडतोब या.' म्हणून तर मी आलो, सारी कामे बाजूस ठेवून आलो.'

दिलावरला ही भानगड माहीत नव्हती. चित्राप्रकरण तर नाही ना? तो दचकला.

'काय बरे असेल काम?' सासऱ्याने पुन्हा विचारले.

'ते मुस्लिम स्त्रियांच्या शिक्षणाचे काम असेल. फातमाने मुस्लिम स्त्रियांना साक्षर करण्यासाठी वर्ग सुरू केले आहेत. तिला ग्रँट वगैरे पाहिजे असेल. तेच काम असेल. मला तर तिने तार केली हे माहीतही नव्हते. ती मला इतकेच म्हणाली की, 'तुमची तार आली आहे व तुम्ही येत आहात.' घरी गेल्यावर कळेल.'

दारात मोटार वाजली. हसनसाहेब व दिलावर वर आले. फातमा सामोरी आली. पित्याने तिला जवळ घेतले.

'बरी आहेस ना बेटा?' त्याने प्रेमाने विचारले.

'होय बाबा. बसा.' ती म्हणाली.

'काय ग, कसले काम?' त्यांनी हसत विचारले.

'मग जेवताना सांगेन. दिलावर, आज छान छान भाज्या आणा. आज हिंदूंच्या शाकाहारपद्धतीची मी रसोई करणार आहे. बाबा, तुम्हाला तसला स्वयंपाक आवडतो ना?'

'हो. पैगंबरसाहेबसुद्धा भाकरीच खात. फार तर मध घेत. कधी नुसता खजूर. माणसाने शक्य तो शाकाहारी असावे असे माझे मत आहे.'

'परंतु मांसाशनास इस्लाम बंदी नाही करीत.'

'दिलावर, अरबस्तान म्हणजे वाळवंट. शेतेभाते नाहीत. नद्या नाहीत. कालवे नाहीत. फार पाऊस नाही. तेथले लोक शाकाहारी कसे होतील? केवळ खजुरावर कसे जगतील? म्हणून तेथे उंट मारावे लागतात. मांस खावे लागते; परंतु अरबस्तान जर हिंदुस्थानसारखा सुजल, सुफल, सस्यश्यामल असता, तर

पैगंबरांनी मांस खाऊ नका असेच सांगितले असते. परिस्थित्यनुरूप सांगावे लागते. जे शक्य व झेपण्यासारखे तेच धर्मपुरुष शिकवतात. त्या चीनमधले लोक म्हणे वाटेल ते खातात. न खातील तर करतील काय? ४० कोटी लोक. नद्यांना मोठमोठे पूर येतात. नद्यांचे प्रवाह बदलतात. मंगोलियातून वाळूची वादळे उठतात व वाळूचे थर येऊन पडतात. नेहमी दुष्काळ. कसे जगतील चिनी लोक? परंतु वाटेल ते खाणारे चिनीही नद्यांचे पूर उतरावे म्हणून 'तीन दिवस मांसाशन बंद' असे ठराव करतात. यावरून त्यांची दृष्टी दिसते. फातमा, शाकाहारीच कर हं जेवण. खूप भाज्या कर!'

'बाबा, माझी एक मैत्रीण आली आहे येथे लहानपणची! तिलाही मी जेवायला बोलावले आहे. तिची आवडती भाजी करणार आहे. दिलावर, टमाटो, कोबी, वगैरे आण हो. फळे आण. पोपया आण. आज बाबांना व माझ्या मैत्रिणीला मेजवानी!'

दिलावर गोंधळला. तो निघाला बाजारात.

'लौकर ये हो दिलावर.'

'अच्छा!'

दिलावर विचार करीत जात होता. 'फातमाची ही कोण मैत्रीण? तीच मुलगी. दुसरी कोण असणार? तिने मला सारे सांगितलेच होते. ती मुलगी पळून पुन्हा फातमाला भेटली वाटते? फातमाचा पत्ता तिला काय माहीत? बरेच दिवसांत तर त्यांचा पत्रव्यवहार नाही. त्या मोलकरणीने फातमास सांगितले का?' तो विचारात मग्न होता. बाजारात त्याने आज खूप खरेदी केली. भाज्या, फळे, सर्व काही विकत घेऊन पाटीवाला करून तो घरी आला.

'फातमा, काय करतेस?'

'पुऱ्या तळीत आहे. दिलावर, श्रीखंड घेऊन ये. जा.'

'फार प्रेमाची मैत्रीण आहे वाटते? मला खर्च नको करूस असे सांगतेस आणि तू आता खर्च करतेस तो?'

'दिलावर, माझी मैत्रीण कधी तरी आली आहे? रोज तुझे ते शेकडो दोस्त येतात. नको हो आणू श्रीखंड!'

'आणीन! श्रीखंड आणीन, बासुंदी आणीन!'

दिलावर गेला आणायला. फातमाने रसोई केली; टमाटोचा रस्सा केला; कच्च्या कोबीची कोशिंबीर; खोबऱ्याची चटणी. दिलावरही श्रीखंड घेऊन आला.

'केव्हा येणार तुझी मैत्रीण ?'

'येईल ! तुला भूक का लागली ? बाबा नि तू बसता का ? आम्ही दोघी मैत्रिणी मागून बसू. मी बाबांना विचारून येते.'

फातमा दिवाणखान्यात आली. ताजी वर्तमानपत्रे आमदारसाहेब वाचीत होते.

'बाबा, बसता का जेवायला ? मैत्रिणीला यायला अवकाश आहे.'

'आपण बरोबरच बसू. मीही जरा बाहेर जाऊन येतो. दिलावर कोठे आहेत ?'

इतक्यात दिलावर तेथे आला.

'काय ?' त्याने विचारले.

'दिलावर, जरा बाहेर येता ? आपण जाऊन येऊ एके ठिकाणी. तोपर्यंत फातमाची मैत्रीणही येईल.'

'चला.'

सासरे- जावई बाहेर गेले. फातमाने चित्राची खोली उघडली. चित्राने मंगल स्नान केले होते. सुंदर रेशमी साडी ती नेसली होती. फातमाने नवी आणून दिली होती. केसांत फुले होती. फातमाने प्रेमाने घातली होती. चित्राचे मुख प्रसन्न दिसत होते.

'चित्रा, चल बाहेर, आपण दोघी बोलत बसू.'

'चल.'

दोघीजणी बाहेर येऊन बसल्या. एका टेबलाभोवती चार खुर्च्या होत्या. टेबलावर ताटे होती.

'फातमा, आता येथून केव्हा जाऊ ?'

'बाबांबरोबर जा. ते सारे करतील.'

'फातमा, तुझे उपकार ! तुझ्या मोलकरणीचे उपकार !'

'चित्रा, प्रेमाला उपकार शब्द नको लावू.'

इतक्यात खाली मोटार वाजली.

'आले वाटते ?' चित्रा म्हणाली.

फातमा उठली. तिने दार उघडले. दिलावर व आमदारसाहेब आले होते.

'आली का ग तुझी मैत्रीण?' आमदारांनी विचारले.

'हो बाबा, तुम्ही गेलेत नि ती आली. चला, तुमची ओळख करून देते.'

फातमा आली. कोट वगैरे काढून आमदारसाहेब आले. दिलावर आला. त्यांनी हातपाय धुतले. फातमाने टुवाल दिला.

'ही का तुझी मैत्रीण?' आमदारांनी विचारले.

'हो.' फातमा म्हणाली.

'चित्रा, हे माझे बाबा! मी सांगत असे ना तुला त्यांच्याविषयी! आणि हे दुसरे कोण? ओळख!'

'तुझे यजमान.'

'होय. यांचे नाव दिलावर.'

'यांचे नाव मी रहीम ठेवले आहे.' चित्रा म्हणाली.

'वा! छान नाव आहे.' आमदारसाहेब म्हणाले. रहीम नाव ऐकून दिलावर काळवंडला. तो काही खाईना; तसाच तो स्वस्थ बसला.

'दिलावर, तुम्ही हातसे धरून? भाजी फक्कड झाली आहे! फातमा, तुझ्या मैत्रिणीस श्रीखंड वाढ की!'

'बाबा, ती जरा आजारी आहे.'

'आणि दिलावर आजारी आहेत वाटते?'

'त्यांनाही जरा बरे नाही.'

'काय होते त्यांना?'

'मी लवकरच सांगेन त्यांना काय होते ते.'

जेवणे झाली. दिलावरचा चेहरा खिन्न होता. त्याला काही तरी दुःख होत होते. शल्य खुपत होते.

'चित्रा, ही घे पानपट्टी. तुझा विडा रंगेल आणि माझाही आता रंगतो हो! दिलावर, ही तुला घे. बाबा, ही तुम्हाला!'

'फातमा, मला शेवटी वाटते!'

'बाबा, बसा सारी. मी तुम्हाला ज्या कामासाठी बोलावले ते आता सांगते. दिलावर बसा. चित्रा, बस.'

सारी बसली आणि फातमाने चित्राची सारी हकीगत पित्याला निवेदिली. दिलावर काळा ठिक्कर पडला. आमदारसाहेब गंभीर झाले.

'दिलावर, तुम्ही इस्लामी धर्माला काळोखी फासलीत. काय हे ? परंतु अद्याप मर्यादित आहात. या मुलीच्या अब्रूचे तरी धिंडवडे केले नाहीत. माझ्याजवळ का नाही मागितलेत पैसे? पैशासाठी का मुली पळवाव्या, विकाव्या ? कोठे हे पाप फेडाल ? किती आहे कर्ज ? मी सारे फेडतो. पुन्हा कर्ज नका करू. जरा बेताने वागा. उद्या खटला झाला तर काय होईल ? माझ्या तोंडाला काळिमा. चित्रा, तू माझ्याबरोबर चल बेटा. मुंबईला पुष्कळ आमदार माझ्या ओळखीचे आहेत. हिंदू आमदार. त्यांच्याकडे तुला नेतो. तुझ्या पित्याचा व पतीचा शोध करतो. हो. दिलावर, फातमा होती म्हणून ही गरीब गाय वाचली. तिची क्षमा माग. तिला चोळीबांगडी दे. तू आता तिचा भाऊ हो. ती तुझी बहीण मान. दरसाल दिवाळीला तिला भाऊबीज पाठव. भेट पाठव.'

दिलावरने माफी मागितली. फातमाने आणून ठेवलेली भेट त्याने चित्राला दिली. सर्वांना आनंद झाला. फातमा व चित्रा दोघी निघून गेल्या. आमदार व दिलावर बोलतबोलत घोरू लागले.

* * *

चित्रा नि चारू : प्रकरण दहावे

आनंदी आनंद

चित्राला घेऊन आमदार हसन मुंबईस आले. ते आपल्या ओळखीच्या एका हिंदू आमदाराकडे गेले. गोविंदराव त्यांचे नाव. 'गोविंदराव, ही घ्या तुमची धर्मभगिनी. हिच्या आईबापांचा मी शोध लावीपर्यंत ही तुमच्याकडे असू दे.' आमदार हसन म्हणाले.

'हसनसाहेब, हिंदूंनी मुसलमानांस नावे ठेवली म्हणजे मुसलमान रागावतात; परंतु हे पाहिलेत ना प्रकार?' गोविंदराव जरा खोचून म्हणाले.

'परंतु गोविंदराव, चित्राला एक मुसलमान तुमच्याकडे आणून पोचवीत आहे. एका मुसलमान मुलीनेच तिला वाचवले. एका मुसलमान मोलकरणीने तिचे रक्षण केले. या गोष्टी का विसरता?' आमदार हसन म्हणाले.

'मुसलमानांचा काय दोष? माझ्या सासूनेच जर गुंड बोलावून त्यांच्या हवाली मला केले, तर त्या गुंडांना तरी कशी नावे ठेवावी? तेही पोटासाठी करतात. बायका-मुली पळवून बड्याबड्या नबाबांना व श्रीमंतांना विकतात. असो. देवाने मला वाचवले. सासूने मुसलमानांच्या हवाली केले. मुसलमान बंधूंनी पुन्हा हिंदूंच्या हाती मला आणून दिले आहे.'

'गोविंदराव, मी जातो. हिचे वडील मामलेदार होते.'

'मामलेदार? काय नाव?'

'बळवंतराव.' चित्राने सांगितले.

'अहो, वेड लागलेले बळवंतराव मामलेदार की काय?'

'वेड लागले?' चित्राने भिऊन धस्स होऊन विचारले.

'अहो, येथे ठाण्याला एक वेड्यांचे हॉस्पिटल आहे. त्यात एक वेडा बळवंतराव आहे. ठाण्याला माझे एक मित्र आहेत, ते सांगतात मजा. मामलेदारच होते ते. वेडात कलेक्टरला सारखे शिव्या देतात.'

'गोविंदराव, मी ठाण्यास जाऊन येतो. मी फातमास शब्द दिला आहे की, तुझ्या मैत्रिणीची सर्व व्यवस्था केल्याशिवाय मी राहाणार नाही. जातो मी. माहिती मिळताच येईन.'

असे म्हणून आमदार हसन ठाण्यास आले. ते त्या वेड्यांच्या दवाखान्यात गेले. तेथील डॉक्टरांना भेटले. तो तेच बळवंतराव असे ठरले. हसनसाहेबांस आनंद झाला.

'त्यांच्या पत्नी, मुलेबाळे येथे जवळच राहातात. त्यांचा गडी भोजू येथे येतो. असा गडी पाहिला नाही बोवा. धन्याचे सारे कुटुंब जणू तो पोशीत आहे. धन्य त्या भोजूची. गरीब माणसे व फार न शिकलेली; परंतु हसनसाहेब, किती उदात्तता त्यांच्या जीवनात आढळते!' डॉक्टर म्हणाले.

'आमच्या फातमाचीही मोलकरीण पाहा ना. बळवंतरावांच्या घराचा रस्ता कोणी दाखवील का?'

'याच मोटारीतून तुम्हाला पोचवतो.'

'आभारी आहे, डॉक्टरसाहेब.'

'अहो आभार कसचे? आम्ही सर्वांनी तुमचे आभार मानले पाहिजेत. तुम्ही एका हिंदू मुलीसाठी किती ही खटपट चालविली आहे! चला.'

मोटारीतून दोघे दत्तमंदिरात आले. दत्तमंदिरातील डॉक्टर मोटारचा आवाज ऐकून बाहेर आले, तो वेड्यांच्या दवाखान्याचे डॉक्टर!

'काय डॉक्टर!'

'आता इकडे कोठे आलेत?'

'बळवंतरावांची मंडळी येथे राहातात ना? त्यांच्या मुलीचा शोध लागला आहे. ती मुंबईस सुरक्षित आहे.'

'त्या पलीकडच्या खोलीत त्या राहातात. चला, मी येतो.'

सीताबाई जप करीत होत्या. मुले शाळेत गेली होती. भोजू दुकानात सामान आणायला गेला होता.

'सीताबाई.'

'कोण?'

'मी डॉक्टर.'

'काय हो डॉक्टर?'

'हे हॉस्पिटलचे डॉक्टर आले आहेत. त्यांच्याबरोबर हे एक मुसलमान आमदार आहेत. तुमची चित्रा सापडली.'

'सापडली?'

'होय हो.'

त्या मातेच्या डोळ्यांत पाणी आले.

'देव पावला. आता यांचे वेड जाईल ना डॉक्टर?'

'होय हो; परंतु बातमी एकदम नाही सांगायची. मनाची तयारी करायची.' हॉस्पिटलचे डॉक्टर म्हणाले.

'चित्राला येथे आणू?' आमदारांनी विचारले.

'हो.' सीताबाई म्हणाल्या.

'आणि मुलीचे यजमान कोठे आहेत?'

'तेही तिचा शोध करीत हिंडत आहेत.'

'आपण वर्तमानपत्रांत जाहिरात देऊ. म्हणजे ते असतील तेथे वाचतील, येतील. सारे गोड होईल आई. तुमची मुलगी शुद्ध, पवित्र आहे. तिचे शील निष्कलंक आहे. कसली शंका नको. आले होते दुर्दैव. गेले!'

'देवाची कृपा.'

'अच्छा. जातो मी.'

'बसा हो. सरबत तरी घ्या. बसा डॉक्टर. तुम्हीही बसा डॉक्टर.' तिघे बसले. इतक्यात भोजूही आला.

'हा हो भोजू.' हॉस्पिटलचे डॉक्टर म्हणाले. भोजूने आमदारसाहेबांस प्रणाम केला. सरबताचे पेले भोजूने सर्वांना आणून दिले. नंतर लवंग, सुपारी, वेलदोडा देण्यात आला.

'जातो हो आई.' आमदार म्हणाले.

'तुमचे फार उपकार.' सीताबाई म्हणाल्या.

‘अहो, तुमच्या चित्राच्या मैत्रिणीचा मी बाप. उपकार कसले?’

‘फातमाचे का तुम्ही वडील?’

‘हो.’

‘फातमाचे आजोबा फार प्रेमळ. फातमा कितीदा यायची माझ्याकडे. सारे सुरळीत झाले म्हणजे या हो. जेवायलाच या. फातमालाही आणा.’

‘आणीन हो.’

आमदारसाहेब गेले. त्यांनी ताबडतोब वर्तमानपत्रांतून बातमी दिली. भोजू आनंदला. हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी बळवंतरावांचे मन हळुहळू चित्राच्या दर्शनार्थ तयार केले.

‘केव्हा येईल चित्रा?’

‘आज येणार होती. गाडी चुकली असेल. पण येईल. आता वेड नाही ना?’

‘कसले वेड? आली का चित्रा?’

‘येणार आहे. पडा.’

असे चालले होते आणि चित्रा आली. गोविंदराव घेऊन आले. बरोबर आमदार हसनही होते. बळवंतरावांनी एकदम चित्राला हृदयाशी धरले.

‘चित्रा, आलीस? आता सारे ठीक होईल. तू म्हणजे आमचे भाग्य, आमचा आनंद.’ बळवंतराव म्हणाले.

‘आणि तुमची मामलेदारीही तुम्हाला परत मिळेल. आम्ही खटपट केली आहे. मुलगी हरवल्यामुळे मेंदू भ्रमिष्ट झाला; म्हणून कामाचे स्मरण राहीना. मुलगी हरवण्यापूर्वीचा कामाचा रेकॉर्ड पाहा, वगैरे बाजू आम्ही मांडली. काळजी नका करू. सारे ठीक होईल.’ गोविंदराव म्हणाले.

‘चित्रा आली, आता भाग्यही येईल. आता सारे ठीक होईल. चारू कोठे आहे?’

‘वर्तमानपत्रांत ‘चित्रा सापडली. चारू, तू परत ये. अमुक पत्त्यावर ये.’ असे दिले आहे. येईल हो चारू. निश्चिंत राहा. मनाला आता त्रास नका देऊ.’ आमदार हसन गोड वाणीने म्हणाले.

‘चल चित्रा, ने मला.’ बळवंतराव म्हणाले.

‘आधी माझ्याकडे सारे चहा घ्या.’ हॉस्पिटलचे डॉक्टर म्हणाले.

'डॉक्टर, तुमचे उपकार. तुम्ही बाबांची काळजी घेतलीत.' चित्रा डोळे भरून येऊन म्हणाली.

डॉक्टरांकडे चहा होऊन चित्रा, बळवंतराव दत्तमंदिरात आली. आमदार हसन व गोविंदराव मुंबईस गेले.

बळवंतरावांची स्मृती आली. त्यांनी आमदारांच्या सल्ल्याने वरपर्यंत अर्ज वगैरे करून अन्यायाची दाद लावून घेतली. पुन्हा मामलेदारी मिळाली. ते कामावर रुजू झाले. ठाण्याहून येताना त्यांनी हॉस्पिटलचे डॉक्टर व दत्तमंदिरातील प्रेमळ डॉक्टर यांना भेटी दिल्या. दत्ताच्या मूर्तीसही एक सुंदर अलंकार करून दिला.

एके दिवशी चारू आला. त्या वेळेस चित्रा एकटीच खोलीत होती. रडत होती. बळवंतराव कामावर गेले होते. मुले शाळेत गेली होती. सीताबाई झोपल्या होत्या. भोजूही झोपला होता आणि चारू आला. चित्रासमोर उभा राहिला.

'चित्रा!' त्याने मंजुळ हाक मारली.

'चारू, माझा चारू! आला, चारू आला!'

दोघांना अत्यानंद झाला. काय बोलणार? त्यांच्या त्या स्थितीचे कोण वर्णन करील?

'आईला सांगते हो चारू. आता जाऊ नको कोठे.'

'तूच गेली होतीस मला सोडून.'

घरात सर्वांना कळले. भोजू धावतच कचेरीत गेला व सांगून आला. रावसाहेब घरी आले. चारू त्यांच्या पाया पडला. देवाला गूळ ठेवण्यात आला. सर्वांना आनंद झाला.

बळवंतरावांनी मोठा सत्यनारायण केला. साऱ्या गावाला प्रसाद वाटण्यात आला.

'चित्रा, आपण जाऊ.'

'चला.'

'परंतु माझी आई आहे हो.'

'पुत्रशोकाने त्यांचा पुनर्जन्म झाला असेल. किती झाले तरी मातृहृदय ते. चला जाऊ. मला भीती नाही वाटत आणि तू जवळ आहेस. खरे ना?' सर्वांचा निरोप घेऊन चित्रा व चारू आपल्या गोडगावला आली. रात्रीची वेळ होती.

'आई!' चारूने हाक मारली.

'आल्ये रे. चारू आला!' आईने हाक दिली. ती धावत आली. कडी काढण्यात आली.

'दारात उभी राहा. मीठमोहऱ्या टाकते हो.' असे म्हणून माता घरात गेली. मीठमोहऱ्या घेऊन आली. त्या ओवाळून टाकण्यात आल्या. मुलगा व सून घरात आली. वृद्ध पिताही उठून खाली आला.

'बाबा, पाया पडतो.' चारू म्हणाला.

'मामंजी, नमस्कार करत्ये.' चित्रा म्हणाली.

'जन्मसावित्री हो. पुत्रवती हो.' सासरा सकंप म्हणाला.

'आई नमस्कार करत्ये.' चित्रा म्हणाली.

'तुझी आता खरीखुरी आई होईन हो. आता नाही हो राग करणार! चित्रा, चारू क्षमा करा मला. बाळ, तू घर सोडून गेलास नि कधी गोडाला स्पर्श नाही हो केला.'

'आई, आता आपण आनंदात राहू.'

'होय हो, राहू.'

खरेच, आनंदीआनंद झाला. सासू आता मनापासून चित्रावर प्रेम करी. ती खरी आई झाली.

चित्राने फातमाच्या मोलकरणीसाठी शंभर रुपये फातमाकडे पाठवून दिले. फातमाला गोड पत्र लिहिले. फातमाचेही आले.

असे दिवस आता आनंदात जात होते. काही महिने गेले. एके दिवशी फातमाचे गोड पत्र आले होते. चित्रा वाचीत होती. मंद हास्य तिच्या तोंडावर होते. चारू दारातून पाहात होता.

'चित्रा, काय आहे त्या पत्रात?'

'आनंदाची वार्ता फातमाने लिहिली आहे. तिला बाळ होणार आहे. तुझा पायगुण असे लिहिले आहे.'

'तू नाही वाटते तिला तुझी वार्ता कळवलीस?'

'बाळ पाळण्यात पडला म्हणजे कळवीन.'

'परंतु तुझे बाळंतपण येथे करायचे की माहेरी?'

'तुझ्या मळ्यात होऊ दे माझे बाळंतपण. सीतादेवी वाल्मीकींच्या आश्रमात प्रसूत झाली. मी माझ्या फुलांच्या, केळींच्या मळ्यात होईन. हसतोस काय चारू ?'

'तू वेडी आहेस म्हणून हसू येते.'

'वेड्या बापाची वेडी मुलगी! खरे ना ?'

दोघे गोड हसली. किती त्यांचे परस्परांवर प्रेम! त्या प्रेमावर दृष्ट न पडो. चित्रा नि चारू यांचा संसार सुखाचा होवो!

❋ ❋ ❋

समाप्त

❋ ❋ ❋

बाल कुमार वाचकांसाठी पुस्तकेच पुस्तके

छोट्यांसाठी मोठ्याटाईपाची सचित्र पुस्तके

बालपंचतंत्र १ ते ५, त्र्यं. पु. थोरात ◆ छान गोष्टी १ ते ७, मालतीबाई दांडेकर
गोष्टींचा तास १ ते ११, भा. म. वैद्य ◆ बाल कल्पना रम्यकथा १ ते ३, बाललेखक
मनोरंजक नीतिपाठ १ ते ४ ग. म. वैद्य ◆ नवलकथा १ ते ९, गो. वि. रानडे
गमतीच्या गोष्टी, नेरूरकर ◆ सुरस गोष्टी, ग. म. वैद्य ◆ मौजेच्या गोष्टी, वैद्य.

कुमारांसाठी मनोरंजक व बोधप्रद पुस्तके

मनोरंजक सुबोध गोष्टी १ ते ६ डॉ. पाटणकर ◆ सदाशिव शेलार, इंगवले
सानेगुरुजींच्या गोड गोष्टी १ ते १० ◆ दिन्या मिनीची धमाल, देशपांडे
गोट्या भाग १ ते ३, चिंगी, खडकावरला अंकुर, ना. धों. ताम्हनकर,
गणितातील गमती, वा. मो. कोळेकर ◆ रंगीत अक्षरे, गो. वि. नामजोशी
सिंहासन बत्तिशी, वैसास ◆ बाल हितोपदेश, थोरात ◆ जादूची होडी, शिरवाडकर

अध्यात्माची आवड निर्माण करणारी संतचरित्रे

राष्ट्रगुरु समर्थ रामदास, न. प. महाजन ◆ अक्कलकोट स्वामी महाराज, मालपाठक
शेगावचे गजानन महाराज, मालपाठक ◆ स्वामी मुक्तानंद, वसंतराव मालपाठक
स्वामी विवेकानंदांची गोष्ट, वैद्य ◆ रामकृष्ण परमहंसांची गोष्ट, ग. म. वैद्य
स्वामी नित्यानंद ◆ ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज, ◆ जे. कृष्णमूर्ती, कृष्णप्रेमी
साईबाबा हाच चमत्कार, डॉ. गवाणकर ◆ स्वामी स्वरूपानंद, शांताराम थत्ते.

पाश्चात्य वाङ्मयाचे मराठीत सुरेख रूपांतर

रॉबिनहुड आणि त्याचे रंगेल गडी, भा. रा. भागवत ◆ डॉन क्विझोट, मा. पं. शिखरे
तीन शिलेदार, सौ. उषा आपटे . ◆ ◆ ◆ वीस वर्षांनंतर, सौ. उषा आपटे
बाल अरेबियन नाइटस् १ व २ थोरात ◆ ऑलिव्हर ट्वीस्ट, दत्त आपटे
गलिव्हरचे प्रवास, भा. म. गोरे ◆ ◆ ◆ रॉबिन्सन क्रूसो, वि. स. सुखठणकर
सिंदबादच्या ७ सफरी, अ. वा. मराठे ◆ पुढे व्हा! १ ते ३, यदुनाथ थत्ते.
पॉकेट डिक्शनरी (इंग्लिश-मराठी) ◆ मॉडर्न डिक्शनरी (इंग्लिश-इंग्लिश-मराठी)
स्टॅण्डर्ड डिक्शनरी १ ते ३ (मराठी-इंगजी-मराठी) ◆ सुलभ हिन्दी-मराठी शब्दकोश
मराठी शब्द रत्नाकर ◆ संस्कृत डिक्शनरी (संस्कृत-इंग्लिश-मराठी-गुजराती)

संपूर्ण यादी मागवावी. विनामूल्य पाठविण्यात येते.

केशव भिकाजी ढवळे

श्रीसमर्थ सदन, पहिली भटवाडी, गिरगाव, मुंबई-४०० ००४.

साने गुरुजींच्या गोड गोष्टी : १ ते १०

भाग पहिला : खरा मित्र

आवडती नावडती, तीन मडकी, न्याय देणारा गुराखी, गोसावी, सोन्याची साखळी आणि खरा मित्र अशा या सहा गोष्टी जिव्हाळा आणि ध्येयनिष्ठा निर्माण करतात.

भाग दुसरा : घामाची फुले

या नऊ विविध गोष्टी म्हणजे मुलांना मेजवानीच! मनोरंजनाबरोबरच नीतिमूल्यांचे दर्शन घडविणाऱ्या या गोड गोष्टी प्रत्येकाच्या जीवनात ध्येय निर्माण करतील.

भाग तिसरा : मनूबाबा

सिलास मार्नरची ही भावपूर्ण कथा. ज्यावेळेस जीवनाचा उपयोग एखाद्या ध्येयासाठी होऊ लागतो तेव्हाच जीवनाचा विकास होऊ लागतो. जीवनाला अर्थ प्राप्त होऊ लागतो.

भाग चौथा : फुलाचा प्रयोग

कृष्णकमळीच्या फुलावर सोनेरी छटा उमटवून दाखविणाऱ्याला एक लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केलेले होते. फुलाला मिळाले का ते? भावपूर्ण हृदयस्पर्शी कथा.

भाग पाचवा : दुःखी

व्हिक्टर ह्यूगोच्या 'ला मिझरेबल' ची ही हृदयस्पर्शी कथा. वालजी चोर होता. एका साधूने त्याला आपली चूक सुधारण्याची एक संधी दिली आणि वालजीचा महात्मा झाला.

भाग सहावा : सोराब नि रुस्तुम

वडील आणि मुलगा यांचे अनोळखी अवस्थेतील द्वंद्व आज जगात अजरामर झाले आहे. या पुस्तकातील इतर चार कथाही मनाचा वेध घेणाऱ्याच आहेत.

भाग सातवा : बेबी सरोजा

जीवनात कितीही संकटे आली, आपत्त्या आल्या तरी सत्य सोडू नये, दलितांविषयी प्रेमभाव ठेवावा. परमेश्वरावर विश्वास ठेवावा. हे पटवून देणारी तामीळ भाषेतील हृदयस्पर्शी कथा.

भाग आठवा : करुणा देवी

शिरीष करुणेला विसरला पण करुणेने कर्तव्याचा सुगंध दरवळत ठेवणारी आपली ज्योत सतत तेवत ठेवली आणि शिरीषच्या अंतरातील विझलेला दीप पुन्हा लावला.

भाग नववा : यती कि पती

यती होण्यासाठी संसाराचा त्याग करण्याचा प्रयत्न विजयने केला; परंतु मुक्तीचा मार्ग आपल्या सारख्या भावनोत्कट वृत्तीच्या माणसाला अनुरूप नाही हे त्याला पटले.

भाग दहावा : चित्रा नि चारू

चित्रा नि तिची मुसलमान मैत्रीण फातमा. मैत्रीच्या कर्तव्यापासून निर्माण झालेली चित्रा नि चारूची ही करुणरम्य कथा चित्राच्या वडिलांच्या प्रेमाचीही साक्ष पटविते.

केशव भिकाजी ढवळे

श्रीसमर्थ सदन, पहिली भटवाडी, गिरगांव, मुंबई ४